रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ६७ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. १२ ऑगस्ट २०२५

किंमत ४ ₹

## पेणमध्ये भाजपचे मानापमान नाट्य

**पेण :** भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशाने दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशिल पाटील यांच्या सुचनेनुसार व आमदार रवी पाटील यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि.१३) सकाळी पेणमध्ये तिरंगा रॅलीचे आयोजन केले आहे. मात्र, आयोजकांमधून जिल्ह्याचे महामंत्री वैकुंठ पाटील, जिल्हा उपाध्यक्ष मंगेश दळवी, मिलींद पाटील व जिल्हा किसान मोर्चाचे अध्यक्ष परशुराम पाटील यांची नावे हेतुपुरस्तर डावळल्याने पेण शहरात दिवसभर भाजपचा नाट्य मानापमान पहायला मिळाला. एकंदरीत गेली दोन ते तीन दिवस पान २ वर

## ड्रग्सचा कारखाना उद्ध्वस्त

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील ताडवाडी येथील बंद असलेल्या घरात ड्रग्स बनविण्याच्या कारखान्याचा नेरळ पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. स्थानिक ग्रामस्थांना त्या बंद असलेल्या घरात नव्याने आलेल्या भाडेकरूंकडून काहीतरी चुकीचे चालल्याचे दिसून आले. त्यानंतर ग्रामस्थांनी मध्यरात्री नंतर त्या ठिकाणी जाऊन हा कारखाना उद्ध्वस्त केला.दरम्यान, नेरळ पोलीस ठाण्यात या ड्रग्स कारखान्याबद्दल गुन्हा दाखल झाला असून पाच जणांना अटक करण्यात आली आहे.पाथरज ग्रामपंचायत मधील ताडवाडीत एका आदिवासी व्यक्तीचे घर आहे. ते घर मुंबई-धारावी येथील चार-पाच जणांनी भाड्याने घेतले. त्यानंतर पान २ वर

# गोगावलेंना ठेंगा

### पालकमंत्रीपदाचे स्वप्न पाहणाऱ्या शिंदे गटाच्या आमदाराला राज्य सरकाने पुन्हा गंडवले

### आदिती तटकरेंना मिळणार ध्वजारोहणाचा मान



| अलिबाग | प्रतिनिधी |

भारतीय स्वातंत्र्याचा ७८ वा वर्धापन दिन रायगड जिल्ह्यात साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने जिल्ह्यातील मुख्य ध्वजारोहणाचा कार्यक्रम अलिबागमध्ये पोलीस मुख्यालयात होणार आहे. या ध्वजारोहणाचा मान अजित पवार गटातील राष्ट्रवादीच्या नेत्या तथा महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांना देण्यात आला आहे. त्यामुळे पालकमंत्री पदाचे स्वप्न बघणारे शिंदे गटातील शिवसेना नेते, राज्याचे रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांना पुन्हा शासनाने गंडवले आहे.

### तटकरेच पालकमंत्री?

**महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा वाद शिगेला पोहोचला. आदिती तटकरेंना पालकमंत्री पद देऊ नये, अशी आग्रही मागणी जिल्ह्यातील शिंदे गटाच्या आमदारांनी केली होती. मात्र, राज्य सरकारने रायगडातील ध्वजारोहणाचा मान आदिती तटकरे यांना दिल्याने राज्य सरकारने शिंदे गटाला घरचा आहेर दिला आहे. त्यामुळे रायगडच्या आदिती तटकरे याच पालकमंत्री होतील, अशी चर्चा सर्वत्र सुरू आहेत.**

रायगड जिल्ह्यातील पालकमंत्री पदावर शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादीमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून वाद सुरु आहेत. जिल्ह्यात शिंदे गटातील आमदार जास्त असल्याने पालकमंत्रीपद भरत गोगावले यांनाच मिळावे, यासाठी आ. महेंद्र दळवी, महेंद्र थोरवे आटापिटा करीत आहे. पालकमंत्री पदावरून तटकरे विरुद्ध गोगावले यांचा वाद अनेकवेळा विकोपाला गेला आहे. एकमेकांना खाली खेचण्याचा प्रयत्न जिल्ह्यात जोरात सुरू आहे. भरत गोगावले हे पालकमंत्री पदाचे बाशिंग बांधून उभे आहेत. परंतु, त्यांना फक्त आश्वासनेच दिली जात असल्याचे चित्र जगजाहीर आहे.

२०२४ मधील विधानसभा निवडणूक झाल्यावर २६ जानेवारी २०२५मध्ये प्रजासत्ताक दिनाचा ध्वजावंदनाचा मान महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांना देण्यात आला होता. त्यानंतर १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहणाचा मान गोगावले यांना मिळण्याची अपेक्षा शिंदे गटाला होती. परंतु, पुन्हा एकदा गोगावलेंना गंडविण्यात आले असून, आदिती तटकरे यांच्या हाती झेंड्यांची दोरी दिली जाणार आहे.

## वेधक

### उसर्ली नदीत बुडून दोघांचा मृत्यू

**पनवेल :** उसर्ली येथील नदीत पोहण्यासाठी गेलेल्या दोघांचा पाण्यात बुडून दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. कळंबोली येथे राहणारे सुमित कदम (३२) त्यांचा मित्र अक्षय देसाई (२८) व अजून दोन मित्र असे चौघेजण उसर्ली येथील नदीत पोहण्यासाठी गेले होते. त्यातील दोघांना पाण्याचा अंदाज न आल्याने ते दोघेजण नदीत बुडाले व त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. पोलीस व अग्निशमन दलाने ग्रामस्थांच्या मदतीने बुडालेल्या दोघांचे मृतदेह पाण्यातून बाहेर काढले.

### महिला भाविकांच्या गाडीला अपघात

**पुणे :** पाईट पापळवाडी येथील कुंडेश्वर देवदर्शनासाठी निघालेल्या पिकअपचा सोमवारी (दि.११) भीषण अपघात झाला. हा पिकअप शंभर फुट खोल दरीत कोसळून भीषण अपघात घडला. या अपघातात आठ महिलांचा दुदैवी मृत्यू झाला आहे. तर, २५ महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. अपघातातील जखमी महिलांवर राजगुरुनगर येथील खासगी रुग्णालयात तसेच चांडोली येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी ठेवण्यात आलेले आहे.

# मतचोरीविरोधात इंडिया आघाडीचा एल्गार

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

मतदार यादीतील बनावट मतदारांवरून निवडणूक आयोगावर आरोप केल्यानंतर राहुल गांधी यांच्या नेतृत्वात सोमवारी (दि.११) इंडिया आघाडीने केंद्रीय निवडणूक आयोगावर मोर्चा काढला आहे. हा मोर्चा पोलिसांनी अडविल्याने खासदारांनी ठिय्या मांडला. या मोर्चात मल्लिकार्जुन खर्गे, शरद पवार, संजय राऊत, अखिलेश यादव, प्रियांका गांधी आदींसह जवळपास ३०० खासदार सहभागी झाले होते. दरम्यान, पोलिसांनी राहुल गांधी, संजय राऊत आणि प्रियंका गांधी यांना ताब्यात घेतले आणि त्यांना संसदेत सोडण्यात आले.

### खासदारांचा संसदेबाहेर ठिय्या




बिहार एसआयआर आणि मतचोरीवर राजकारण आता तापले आहे. विरोधी पक्ष आणि निवडणूक आयोग यांच्यात संघर्ष सुरू असून मतचोरीवर रस्त्यापासून संसदेपर्यंत युद्ध सुरू आहे. बिहारमधील मतदार यादीतील अनियमितता आणि निवडणुकीत झालेल्या हेराफेरीच्या विरोधात इंडिया आघाडीने मोर्चा काढला होता. पान २ वर

### अधिकाराचे रक्षण करण्यासाठीची लढाई

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली. आम्ही निवडणूक आयोगाची भेट घेणार होतो. मात्र, आम्हाला अडवण्यात आले. निवडणूक आयोग चर्चेला का घाबरत आहे? आज आम्ही निवडणूक आयोगाला भेटणार होतो, तेव्हा इंडिया आघाडीच्या सर्व खासदारांना थांबवण्यात आले आणि ताब्यात घेण्यात आले. मत चोरीचे सत्य आता देशासमोर आहे. ही लढाई राजकीय नाही. ही लोकशाही, संविधान आणि 'एक व्यक्ती, एक मत' या अधिकाराचे रक्षण करण्यासाठीची लढाई आहे.**

# अलिबागमध्ये शिवसेनेचे जनआंदोलन

- **भ्रष्टाचारी मंत्र्यांविरोधात आक्रमक**
- **खुर्च्या खाली करण्याची मागणी**




| अलिबाग | प्रतिनिधी |

भ्रष्टाचारी मंत्र्याविरोधात शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्ष आक्रमक होत त्यांच्या कृत्यांचा थेट सार्वजनिक पर्दाफाश केला. महाराष्ट्रातील सत्ताधारी मंत्र्यांच्या भ्रष्टाचार, गैरव्यवहार आणि बेताल वक्तव्यांविरुद्ध मोर्चा काढण्यात आला. 'बाजार उठलाय घोटाळ्यांचा, खुर्चीवरून उठवा भ्रष्टाचारांना' अशा घोषणा देत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या असंख्य कार्यकर्त्यांनी सोमवारी (दि.११) जिल्हाधिकारी कार्यालयावर हल्लाबोल केला.

जनतेचा पैसा हा कोणाच्या बापाचा नाही, भ्रष्टाचार करणारे आता तुरुंगातच जातील! अशा घोषणा देत शिवसेना कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय मोर्चा काढला. शिवसेना उपनेते बबन पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. यावेळी जिल्हाप्रमुख तथा माजी आ. मनोहर भोईर, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, जिल्हा प्रमुख नंदकुमार शिर्के, पान २ वर



# टीबी मुक्तीसाठी पुढाकार घ्या

## तहसीलदार विक्रम पाटील यांचे आवाहन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आदिवासी वाड्यांमध्ये कुपोषणाचे प्रमाण असल्याची शक्यता अधिक असते. कुपोषणामुळे टीबी होण्याची शक्यता आहे. टीबी रोखण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तालुक्यात ६२ ग्रामपंचायतींपैकी ४१ ग्रामपंचायती टीबीमुक्त झाल्या आहेत. उर्वरित ग्रामपंचायती टीबीमुक्त करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. आदीवासी वाड्या, पाड्यांमध्ये जाऊन जनजागृती करा, असे आवाहन अलिबागचे तहसीलदार तथा अलिबाग तालुका टीबी फोरम कमिटीचे अध्यक्ष विक्रम पाटील यांनी केले. अलिबाग तालुका टीबी फोरम कमिटीची बैठक गुरुवारी (दि.७) अलिबाग तहसील कार्यालयात पार पडली. यावेळी ते बोलत होते.

यावेळी तालुका आरोग्य अधिकारी तथा टीबी फोरम कमिटीच्या सचिव डॉ. अश्विनी सपकाळ व सर्व सदस्य उपस्थित होते. बैठकीदरम्यान, डॉ. अश्विनी सपकाळ यांनी टीबी रुग्णांवर होणाऱ्या उपचारासह पोषण आहाराची माहिती दिली. रुग्णांना दत्तक घेऊन निक्षय मित्रांच्या मदतीने त्यांना पोषण आहार देण्याचा प्रयत्न केला जात आहे. या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचेदेखील त्यांनी सांगितले. पुढे बोलताना डॉ. अश्विनी सपकाळ यांनी सांगितले की, जास्तीत जास्त अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी निक्षय मित्र होण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे व टीबी रुग्णांना दत्तक घेऊन त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. खेड्यापाड्यात आणि वाडी वस्त्यांवर टीबी संशयित रुग्ण शोध शिबीर घेतले जात आहेत. आतापर्यंत ४१ ग्रामपंचायती टीबी मुक्त करण्यास यश आले आहे. या ग्रामपंचायतीमध्ये गेल्या दोन वर्षात एकही टीबी रुग्ण सापडला नाही. टीबी फोरम कमिटीच्या माध्यमातून गावागावात वेगवेगळे उपक्रम राबवून संपूर्ण तालुका टीबी मुक्त करण्यासाठी प्रयत्न करू या. यामध्ये सर्वांचे योगदान मोलाचे राहणार आहे, असे तालुका टीबी फोरम कमिटीच्या सचिव तथा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विनी सपकाळ यांनी सांगितले.

# मत्स्यविभागाचा भ्रष्ट कारभार उघड

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुका मराठी पत्रकार संघाने मत्स्यविभागातील भ्रष्टाचाराचा भांडाफोड केला आहे. पत्रकार संघाने मागील वर्षीचे बेपत्ता खलाशी आणि यावर्षीचे चार मच्छिमारांचे मृत्यू हे संजय पाटील यांच्या दुर्लक्षामुळेच झाल्याचा आरोप केला आहे. त्यानंतर, सहाय्यक आयुक्त संजय पाटील यांनी आत्महत्या करण्याची धमकी देऊन स्वतःच्या कूकर्मांवर पडदा टाकण्याचा केविलवाणा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सत्य दडपण्यासाठी बोटी दुरुस्तीसाठी जात असताना अपघात झाला, अशी खोटी बातमी त्यांच्याकडून पसरविण्यात आली होती.

उरण पत्रकार संघाने आरोप केला आहे की, पावसाळी बंदी असतानाही करंजा बंदरावर अवैध मासेमारी सुरू होती. बंदीमध्ये वरून आदेश घेऊन काही बोटी सोडल्या गेल्या. त्यामुळे मच्छिमारांचे बळी गेले. मृत कुटुंबांना इन्शुरन्सच्या माध्यमातूनही भ्रष्टाचार व षड्यंत्र रचले गेले आहे. एलईडी लाईट, पर्ससीन नेट आणि करोडोंची हप्तेवसुली या अवैध कारवायांत विभागातील अधिकाऱ्यांचे आर्थिक स्वार्थ प्राधान्याने दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर पत्रकार संघाने पाटील यांच्या निलंबनाची लेखी मागणी केली आहे. सहआयुक्त नागनाथ भादुले यांनी उरण येथे पत्रकार संघाच्या कार्यालयात भेट देत आरोप सिद्ध झाल्यामुळेच संजय पाटील आत्महत्येची धमकी देत असल्याचे स्पष्ट केले. मात्र, संजय पाटील व परवाना अधिकारी सुरेश बाबूलगावे यांनी नेहमीप्रमाणे सुट्टीचा अर्ज दाखल करून पळ काढला आहे.

दरम्यान, पत्रकार संघाने संजय पाटील यांच्या निलंबनासह काही महत्वाच्या मागण्या केल्या आहेत. तसेच, या मागण्यांसाठी १५ ऑगस्ट रोजी मुंबई आयुक्त कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा देखील पत्रकार संघाने दिला आहे. सहआयुक्त राजू भादुले यांनी दोन दिवसांत मंत्रालयात संबंधित बैठकीचे आश्वासन दिले असले, तरी कारवाई झाली नाही तर पत्रकार संघ व मच्छीमार समाज उपोषणावर ठाम असल्याचे स्पष्ट केले आहे.




**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई-निविदा सूचना क्रमांक ३२/२०२५-२०२६ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामाकरीता ई-निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रूपये |
|---|---|---|
| १. | अलिबाग विभाग... अलिबाग विभागीय कार्यालयातील जुने वाहन क्र. एमएच-०६-बीएम-५४०१ (मारूती स्विफ्ट डिझायर एलएक्सआय) चे जसे आहे तेथे आहे या तत्वावर लिलाव करणे. (तिसरी मागणी) | रू. ३,२६,०२२.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक १२/०८/२०२५ ते दिनांक १८/०८/२०२५ पर्यंत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त कामाबाबत दिनांक १३/०८/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमूद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/महामंडळाचा खुलासा दिनांक १४/०८/२०२५ पासून वर नमूद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. प्रशांत पांडुरंग नाचण, रा.ए-५०४, अखिल, गोळेवाडी, कुळगाव, तलाठी ऑफिस जवळ, बदलापूर, ठाणे, ४२१५०३, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन :- मौजे नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड, येथील बिनशेती मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ४७१/३२ | २.२६.०० | २२.६० | श्री. श्याम कुमार श्रीनिवासन |

वरील वर्णनाच्या बिनशेती जमीन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या १५ (पंधरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक : १२/०८/२०२५

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत 'पुष्प विमल'निवास
नानामास्तर नगर, मुद्रे,
मो.नं. ७३८५००४८०६


## पान १ वरून

### पेणमध्ये भाजपचे मानापमान नाट्य

ते तीन दिवस भाजपच्या पदाधिकाऱ्यांच्या नेमणुकींवरून समाज माध्यमांवर तू-तू, मै-मै सुरू आहे. त्याचाच पुढचा अंक तिरंगा रॅलीच्या आयोजकांच्या नावाच्या यादीवरून पुन्हा पाहायला मिळाला. त्यामुळे कळत-नकळत भाजपमध्ये दोन गट कार्यरत असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. आगामी येणाऱ्या निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर हे गटातटाचे राजकारण भाजपला महागात पडल्याशिवाय राहणार नाही. याविषयी नाराज गटातून पेण मंडळ अध्यक्षांबद्दल नाराजी व्यक्त केली जात आहे.

### मतचोरीविरोधात इंडिया आघाडीचा एलगार

विरोधी पक्षाचे खासदार निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे जात असतना पोलिसांनी त्यांना मध्येच अडवले. त्यांना मोर्चासाठी परवानगी नसल्याचे सांगत मोर्चा अडवण्यात आले. राहुल गांधी आणि पोलिसांमध्ये देखील वाद झाले. यावेळी संविधान वाचविण्यासाठी आम्ही लढत आहोत. आम्हाला स्पष्ट आणि सुरक्षित मतदार यादी पाहिजे. 'एक व्यक्ती एक मत' यासाठी आमची लढाई असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. तर खासदार सुप्रिया सुळे यांनी, आम्ही महात्मा गांधींच्या मार्गाने लढाई लढणार आहोत, असे सांगितले. समाजवादी पक्षाचे खासदार अखिलेश यादव म्हणाले की, ते आम्हाला रोखण्यासाठी पोलिसांचा वापर करत आहेत. पोलीस विरोधी खासदारांना निवडणूक आयोगाकडे कूच करण्यापासून रोखत असताना त्यांनी हे सांगितले, त्यानंतर ते निषेध करण्यासाठी बसले. यावेळी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाच्या कारभाराचा निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी मोर्चामध्ये सहभागी झालेल्या खासदारांनी आयोगाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी पोलिसांकडून आंदोलकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला. अनेकांची यावेळी धरपकड करण्यात आली.

दरम्यान, विरोधी पक्षाच्या खासदारांनी पोलिसांचे बॅरिकेट्स तोडले. अखिलेश यादव यांनी बॅरिकेड चढून पोलिसांना ओलांडण्याचा प्रयत्न केला. यावेळी राहुल गांधी, प्रियांका गांधी, संजय राऊत व अखिलेश यादव यांच्यासह अनेक खासदारांना ताब्यात घेण्यात आले. त्यांना त्यानंतर पुन्हा संसदेत सोडण्यात आले. दरम्यान, ३० खासदारांना निवडणूक आयोगात भेटीसाठी परवानगी देण्यात आली आहे. जास्त खासदार आल्याने मोर्चा अडविण्यात आला, असे दिल्ली पोलिसांनी सांगितले.

### ड्रग्सचा कारखाना उद्ध्वस्त

१०ऑगस्टच्या मध्यरात्री त्या ठिकाणी एक मारुती ब्रिझा कार (एमएच-४७-बीटी-४५२९) सोबत घेऊन आल्याचे ग्रामस्थांनी पाहिले होते. मात्र, ते घर भाड्याने दिल्याने भाडेकरूंचे कोणी ओळखीचे आले असतील असे त्यांना वाटले. परंतु, मध्यरात्रीनंतर त्या घरामध्ये काही हालचाली ताडवाडी ग्रामस्थांनी पाहिल्या. त्यामुळे सर्व ग्रामस्थांनी मध्यरात्री दोन वाजता त्या माळरानावरील घराकडे जाण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी तेथे असलेले पाच तरुण हे वेगवेगळ्या लोखंडी डब्यांमध्ये काही द्रव्य वस्तू मिसळत असल्याचे आढळून आले. त्यात त्या सर्व साहित्याला उग्र वास येत असल्याने ग्रामस्थांनी तुम्ही हे काय करता आणि एवढ्या रात्री जागे राहून कोणते काम करीत आहात, असा प्रश्न केला. मात्र, घरात असलेल्या भाडेकरू व्यक्तींनी आदिवासी ग्रामस्थांवर अरेरावी करण्यास सुरुवात केली. त्यावेळी ग्रामस्थांनी त्या सर्व पाच जणांना पकडले आणि बेदम मारहाण केली. याबाबत ग्रामस्थांनी नेरळ पोलीस ठाण्याला कळवले. मध्यरात्री तीन वाजता नेरळ पोलीस घटनास्थळी पोहोचले. त्या ठिकाणी असलेल्या वस्तू आणि साहित्य लक्षात घेऊन नेरळचे प्रभारी पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांना त्या ठिकाणी बर्फाच्या लाद्या आणि रसायने पाहून हा ड्रग्स बनविण्याचा प्रकार असल्याचे लक्षात आले. पोलिसांनी पंचनामा करून बंद असलेल्या घरातील नशिले पदार्थ बनविण्याचा कारखाना उद्ध्वस्त केला. अटक करण्यात आलेल्या पाच जणांमध्ये एक तरुण हा डी फार्मसीपर्यंत शिक्षण घेतलेला आहे.

### अलिबागमध्ये शिवसेनेचे जनआंदोलन

संपर्क प्रमुख प्रसाद भोईर, रायगड जिल्हा सल्लागार सतीश पाटील, महिला संघटिका दीपश्री पोटफोडे आदी पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

शिवसेनेने निवेदनात थेट आरोपांची झोड उठवत सांगितले की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट यांनी ६० कोटींचा घोटाळा आणि १ हजार ५०० कोटींचा गैरव्यवहार केल्याचा गंभीर आरोप असून, संस्थेत कोट्यवधींचा भ्रष्टाचार कार्यान्वित आहे. याशिवाय सरकारचा पैसा हा आमच्या बापाचा आहे, अशी गर्विष्ठ भाषा वापरून लोकशाहीचा अपमान करण्यात आला आहे. मंगलप्रभात लोढा आणि नितेश राणे यांच्यावर जनतेचा पैसा भ्रष्ट मार्गाने उधळून राज्याला कर्जाच्या दलदलीत ढकलल्याचा आरोप करण्यात आला आहे. खुद्द गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या मालकीचे डान्स बार असल्याने, कायदे धाब्यावर बसवून गैरव्यवहार सुरू असल्याचा ठपका ठेवत, त्यांची मंत्रीपदावरून तात्काळ हकालपट्टी करण्याची मागणी करण्यात आली.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागील साडेतीन वर्षांतील दुप्पट वाढीव अंदाजपत्रक घोटाळ्यांची मार्फत विशेष ऑडिट करून उच्चस्तरीय चौकशी करावी. नाशिक हनिट्रॅप प्रकरणातील पडद्याम ागील सूत्रधारांचा पर्दाफाश, मतचोरी प्रकरणात निवडणूक आयोगाने तातडीने श्वेतपत्रिका प्रसिद्ध करणे, गृहनिर्माण मंत्री प्रताप सरनाईक यांच्या रॅपिडो प्रकरणाची सखोल चौकशी, महिला व बालकल्याण खात्याने मंजूर अनुदान रद्द करण्याचा निर्णय घेतल्यास प्रथम संबंधित मंत्र्यांवर आणि अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली. दरम्यान, शिवसेनेचा मोर्चा जेव्हा अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आला, त्यावेळी पोलिसांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्य प्रवेशद्वार बंद करून शिवसैनिकांच्या जमावाला आत येण्यास मज्जाव केला. त्यावेळी संतप्त जमाव आणि पोलीस यांच्यामध्ये वाद झाले. गेट उघडण्यासाठी शिवसैनिकांनी शर्तीचे प्रयत्न केले. अखेर दहा जणांना आतमध्ये सोडले जाईल या बोलीवर शिवसेनेच्या शिष्टमंडळाला सोडण्यात आले. परंतु, गेट उघडल्यावर अनेकांनी आतमध्ये घुसण्याचा प्रयत्न केल्यावर पोलीस निरीक्षक साळे आणि काही शिवसैनिकांमध्ये शाब्दिक वाद झाला.

# गोवंश हत्याप्रकरणी तिघांना अटक



**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यात गोवंश जनावरे चोरी करून त्यांची हत्या करण्याच्या तक्रारीत वाढ झाली होती. त्यामुळे म्हसळा पोलिसांनी आरोपींवर कडक कारवाईचा बडगा उचलला आहे. दरम्यान, म्हसळा पोलिसांनी रविवारी (दि.१०) दुपारच्या सुमारास जांभूळ गावाच्या हद्दीत मुबीन हुर्जुक यांच्या फार्म हाऊसवर धाड टाकली. त्या ठिकाणाहून गोवंश जातीच्या खोंडाची हत्या केलेल्या तीन आरोपींना मुद्देमालासह रंगेहाथ पकडून त्यांना जेरबंद करण्यात आले आहे. सलमान नजीर डावरे (४०), रयांन रफिक हुर्जुक (२२) व मेहरान रफिक पेणकर (१९) यांनी तांबड्या रंगाच्या खोंडाची कत्तल करताना पोलिसांना रंगेहाथ सापडले आहेत. त्यांच्याकडून पोलिसांनी हत्या केलेल्या खोंडासह मॅक्स टेम्पो आणि गोहत्या करण्यासाठी वापरण्यात आलेली हत्यारे जप्त केली आहेत. याबाबत म्हसळा पोलीस ठाण्यात या तीनही आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर एडवळे हे करीत आहेत. या कारवाईबद्दल पशुपालकांकडून समाधान व्यक्त होत आहे.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या बिनशेती जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**परिशिष्ट**
**मौजे चेंढरे, ता-अलिबाग, जि-रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत -**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.चौ.मी. | रूपये | पैसे |
| प्रिया प्रशांत गावंड | १०२ | ५ | ३-०५-०० | ५३ | २० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- १२/०८/२०२५
मो. नं. ९०२८९८२२७७

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
ई मेल:-adv.jayeshmhase@gmail.com


# माथेरान घाटात दुर्दैवी अपघात

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरान घाटातील नांगरखिंड वळणावर एक दुर्दैवी अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून त्याचा सहकारी किरकोळ जखमी झाला आहे. विजय मिणमिणे व मोहम्मद असे दुचाकीस्वारांचे नाव असून, घाट उतरत असताना मागून अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला आहे. मात्र, अपघात करणारा वाहनचालक फरार झाला. जखमींना तात्काळ भिवपुरी येथील रायगड हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मोहम्मद यांना उपचारानंतर घरी सोडण्यात आले असून विजय मिणमिणे यांची प्रकृती चिंताजनक आहे. नेरळ पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाचा शोध सुरू केला आहे.


**महावितरण** — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**जाहीर निवेदन**

महापारेषण यांचे २२०/१००/२२ के.व्ही. कांदळगाव उप केंद्रातील २२ केव्ही बसचे देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यासाठी खालीलप्रमाणे माणगाव उप विभाग, रोहा विभाग, महावितरण यांचे २२ के.व्ही. वीजवाहिन्या बंद करण्यात येत आहे.

| अ. क्र. | २२ के.व्ही. वीजवाहिन्या बंद करण्यात येत आहे. | दिनांक | वेळ | प्रभावित होणारी गावे |
|---|---|---|---|---|
| १ | २२के.व्ही. माणगाव फीडर | १२.०८.२०२५ | ९:०० ते १७:०० | कसबेवाडी, घोटेवाडी, चनाट, हरवंडी, केळगणं, बोरवाडी , शिरसाड, चाच, माजुको, कुंभे, कामतवाडी, मळ्याची वाडी , धामणी, कातळाची वाडी, भारीदवाडी, हरवंडी कोंड , कोशिंबळे, निजामपूर, भाले,कुंभारते कोस्ते खु., कोस्ते बु, कोस्ते आदिवाडी, बागवाडी, फणसवाडी, माणगाव, उतेखोल, उतेखोलवाडी, खादाड , भादाव, नानोरे, मोरबा, साईव, मोजुरने, डोंगरोली, विहूले, विहूलेआदिवासीवादी, उसर, उसर बु., विहूले कोंड , काकल, नाळेकोंडी, रानवडे, महादपोली, खारवली, साले, पळसगाव, पळसगाव खु., खरवली, रिले, सुरव, पाणेसे, बोरघर, आमडोशी, होडगाव, जोर घरोशी, जावळी, मुगवली, घरोशी आदिवासीवाडी, गांगवली, बांबवली, जांभूळवाडी , लोणशी, बोरघर, इंदापूर , दाखणे, कालवा, रुदोली, गंगेवाडी, पोटनेर, माकटी, उमरोली, दिवाळी, कोलाड, आंबेवाडी, पाले, संबे, वरसगाव, रानवाड, घोटवड, खांब, घाटाने, देवकाने, नडवली, अनव्हाळ, वैजनाथ,पुई, पुगाव, आदिवासीवाडी, चिंचवली, कोलाड आदिवासीवाडी, विंचवली, लोणशी मोहल्ला,वावे,गारळ, आडघर, उमरोली,चेरवली, लहाने सूरव, जाधव सूरव, राजीवली,बामणोली,मांगवली,कळमजे, साळवे, धालघर, करंबेली, खर्डी बु., खर्डी खु., चव्हाणवाडी, खरबाची वाडी,कात्याची वाडी, निलगुण, निवी, कालवण, कशेणे, पान्साई, वाढवण,कोल्हाण, नागरोली, वारक, विघवली, पाचोळे, मुठवली |
| २ | २२के.व्ही. धाटाव फीडर | | | |
| ३ | २२के.व्ही. कोलाड फीडर | | | |
| ४ | २२के.व्ही. कुडली फीडर | | | |
| ५ | २२के.व्ही. एमआयडीसी फीडर | | | |

अधिकमाहितीसाठी :– eeroha@mahadiscom.in, eeroha@rediffmail.com

सही/–
कार्यकारी अभियंता, सं व सु. म.रा.वि.वि.कं.मर्या., विभाग रोहा



**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, दि.०४/०८/२०२५ रोजीच्या दैनिक कृषीवल या वृत्तपत्रामध्ये ॲड. चैतन्य सुनिल खंदारे, ऑफीस पत्ता : १३१७, दलामाल टॉवर, फ्री, प्रेस मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई यांनी मिळकतीचे खरेदीदारांतर्फे खालील मिळकतीच्या हस्तांतरणाविषयी जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | नगर भूमापन क्र. | क्षेत्र (चौ.मी.) | धारणाधिकार |
|---|---|---|---|
| धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड | ३१२ | १७४०.१० | अ |

असे असले तरी, सदरहू नोटीसीस आमचे अशिल १) श्रीमती. शारदा कृष्णा गोठणकर, २) श्री.तेजस कृष्णा गोठणकर व ३) सौ. तेजस्वी किशोर पाटील सर्व रा.मु.पो.धोकवडे, ता.अलिबाग, जि. रायगड यांनी हरकत घेण्यास सांगितले, त्यांच्या सांगण्यावरुन व त्यांनी दिलेल्या माहितीवरुन दि. ०४/०८/२०२५ रोजीच्या जाहीर नोटीसीस हरकत वजा उत्तर खालीलप्रमाणे:-

सदरहू मिळकतीसंदर्भात अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात श्री.वामन श्रीधर फाटक मयत तर्फे वारस व इतर यांनी श्री. कृष्णा केशव गोठणकर यांच्याविरुद्ध रेग्युलर मुकदमा नं. ७८/२०११ ने मौजे धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील सिटी सर्व्हे नं. ३१२, क्षेत्र १७४०.१० चौ.मी. या मिळकतीसंदर्भात अतिक्रमण दुर करण्यासाठी व इतर मागण्यांकरीता दि.२७/०४/२०११ रोजी दावा दाखल केला होता. सदरहू दाव्याचा निकाल दि.२७/०४/२०२३ रोजी झालेला आहे. त्यानंतर श्री. कृष्णा केशव गोठणकर मयत तर्फे वारस श्रीमती. शारदा कृष्णा गोठणकर व इतर यांनी रेग्युलर मुकदमा नं.७८/२०११, आदेश दि. २७/०४/२०२३ विरुद्ध अलिबाग येथील जिल्हा न्यायालय रायगड, अलिबाग येथे दिवाणी अपिल दाखल केलेले आहे व सोबत दिवाणी चौकशी अर्ज क्र.३८/२०२५ ने अर्ज दाखल केलेला आहे, तो अर्ज प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहे. तसेच श्री.वामन श्रीधर फाटक मयत तर्फे वारस व इतर यांनी अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात रेग्युलर दरखास्त नं.३२/२०२३ ने दरखास्त दाखल केलेली आहे, सदरहू दरखास्त ही प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहे.

मौजे धोकवडे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं.३१२, क्षेत्र १७४०.१० चौ.मी. या मिळकतीमध्ये धोकवडे ग्रामपंचायत हद्दीतील घर नं.६७४ हे श्री.कृष्णा केशव गोठणकर यांच्या नावाने असून ते सुमारे ४० वर्षापुर्वीचे आहे. सदरहू घरात श्री.कृष्णा केशव गोठणकर व त्यांचे कुटुंबिय ४० वर्षापासून राहत होते व आजतागायत राहत आहेत व तशी ग्रामपंचायत सदरी नोंद आहे.

मौजे धोकवडे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं.३१२, क्षेत्र १७४०.१० चौ.मी. या मिळकतीविषयी जिल्हा न्यायाधिश रायगड, अलिबाग यांच्या कोर्टात सिव्हील अपिलातील दिवाणी चौकशी अर्ज क्र.३८/२०२५ ने प्रलंबित आहे, तसेच अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात रेग्युलर दरखास्त नं.३२/२०२३ ने दरखास्त प्रलंबित असताना खरेदी-विक्रीचा व्यवहार केल्यास आमचे अशिल हे जमिन मालक व खरेदीदार यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करतील व होणाऱ्या सर्व परिणामांस तथाकथित जमिन मालक व खरेदीदार हेच जबाबदार राहतील. सदरहू मिळकतीच्या मालकीहक्कविषयी वर नमूद वस्तुस्थिती असल्यामुळे आमचे अशिलांची सदरहू मिळकतीच्या हस्तांतरणास सक्त हरकत आहे.

अलिबाग.
दिनांक : ११/०८/२०२५

**ॲड. सुनिल के. वाकडे**
डी-१, तळमजला,
हिराबाग को. ऑप. हौ. सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा. नं. ९८६७७१५५२४



**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, दि. ०४/०८/२०२५ रोजीच्या दैनिक कृषीवल या वृत्तपत्रामध्ये ॲड. चैतन्य सुनिल खंदारे, ऑफीस पत्ता : १३१७, दलामाल टॉवर, फ्री, प्रेस मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई यांनी मिळकतीचे खरेदीदारांतर्फे खालील मिळकतीच्या हस्तांतरणाविषयी जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | नगर भूमापन क्र. | क्षेत्र (चौ.मी.) | धारणाधिकार |
|---|---|---|---|
| धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड | ३१२ | १७४०.१० | अ |

असे असले तरी, सदरहू नोटीसीस आमचे अशिल १) श्रीमती इंदु सुदाम सावंत, २) श्री.रंजीत सुदाम सावंत व ३) सौ. शैला चंद्रकांत मांडवकर सर्व रा.धोकवडे (गणेश आळी), पो.धोकवडे, ता.अलिबाग, जि. रायगड यांनी हरकत घेण्यास सांगितले, त्यांच्या सांगण्यावरुन व त्यांनी दिलेल्या माहितीवरुन दि.०४/०८/२०२५ रोजीच्या जाहीर नोटीसीस हरकत वजा उत्तर खालीलप्रमाणे:-

सदरहू मिळकतीसंदर्भात अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात श्री. वामन श्रीधर फाटक मयत तर्फे वारस व इतर यांनी श्री. सुदाम बाबाजी सावंत तर्फे वारस श्रीमती. इंदु सुदाम सावंत, श्री. रंजीत सुदाम सावंत व सौ.शैला चंद्रकांत मांडवकर यांच्या विरुद्ध रेग्युलर मुकदमा नं.७७/२०११ ने मौजे धोकवडे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं. ३१२, क्षेत्र १७४०.१० चौ.मी. या मिळकतीसंदर्भात अतिक्रमण दुर करण्यासाठी व इतर मागण्यांकरीता दि.२७/०४/२०११ रोजी दावा दाखल केला होता. सदरहू दाव्याचा निकाल दि.२७/०४/२०२३ रोजी झालेला आहे. त्यानंतर श्रीमती. इंदु सुदाम सावंत व इतर यांनी रेग्युलर मुकदमा नं.७७/२०११, आदेश दि.२७/०४/२०२३ विरुद्ध अलिबाग येथील जिल्हा न्यायालय रायगड, अलिबाग येथे दिवाणी अपिल दाखल केलेले आहे व सोबत दिवाणी चौकशी अर्ज क्र.३९/२०२५ ने अर्ज दाखल केलेला आहे, तो अर्ज प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहे. तसेच श्री. वामन श्रीधर फाटक मयत तर्फे वारस व इतर यांनी अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात रेग्युलर दरखास्त नं.३१/२०२३ ने दरखास्त दाखल केलेली आहे, सदरहू दरखास्त ही प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहे.

मौजे धोकवडे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं.३१२, क्षेत्र १७४०.१० चौ.मी. या मिळकतीमध्ये धोकवडे ग्रामपंचायत हद्दीतील घर नं.४३१ हे श्री.सुदाम बाबाजी सावंत यांच्या नावाने असून ते सुमारे ४० वर्षापुर्वीचे आहे. सदरहू घरात श्री.सुदाम बाबाजी सावंत व त्यांचे कुटुंबिय ४० वर्षापासून राहत होते व आजतागायत राहत आहेत व तशी ग्रामपंचायत सदरी नोंद आहे.

मौजे धोकवडे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं.३१२, क्षेत्र १७४०.१० चौ.मी. या मिळकतीविषयी जिल्हा न्यायाधिश रायगड, अलिबाग यांच्या कोर्टात सिव्हील अपिलातील दिवाणी चौकशी अर्ज क्र. ३९/२०२५ ने प्रलंबित आहे, तसेच अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात रेग्युलर दरखास्त नं.३१/२०२३ ने दरखास्त प्रलंबित असताना खरेदी-विक्रीचा व्यवहार केल्यास आमचे अशिल हे जमिन मालक व खरेदीदार यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करतील व होणाऱ्या सर्व परिणामांस तथाकथित जमिन मालक व खरेदीदार हेच जबाबदार राहतील. सदरहू मिळकतीच्या मालकीहक्कविषयी वर नमूद वस्तुस्थिती असल्यामुळे आमचे अशिलांची सदरहू मिळकतीच्या हस्तांतरणास सक्त हरकत आहे.

अलिबाग.
दिनांक : ११/०८/२०२५

**ॲड.सुनिल के. वाकडे**
डी-१, तळमजला,
हिराबाग को.ऑप.हौ. सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ९८६७७१५५२४

## निवडक



### अध्यक्षपदी केशव राणे बिनविरोध

**पनवेल** : पनवेल येथील सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा सी.के.टी शाळेत पार पडली. सभेचे अध्यक्षस्थानी शिवराज राणे होते. यावेळी संघाच्या अध्यक्षपदी केशव राणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सभेची सुरुवात उपाध्यक्ष संतोष चव्हाण यांनी सर्वांचे स्वागत करून केले व मंडळाचा वार्षिक आर्थिक अहवाल मंजूर झाला. सचिव रामचंद्र मोचेमाडकर यांनी मागील वर्षातील कार्यकाळातील संघाच्या कार्याची माहिती दिली व संस्थेने वृक्षारोपण, महिला दिन, वर्धापन दिन, संमेलन अशा विविध सामाजिक कार्याचा आलेख सभेपुढे मांडला. त्यानंतर सभेने केशव राणे यांची २०२५-२९ कार्यकालासाठी निर्विवाद एकमताने निवडून दिले. केशव राणे गेली सहा वर्ष अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळत होते. त्यांनी पुन्हा अध्यक्ष पदाची संधी दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. त्यांनी मंडळाचे प्रगतीसाठी आणि वाढीसाठी जे प्रयत्न केले त्याचा लेखाजोखा सभेपुढे मांडला तसेच संघांचे विवाह मंडळ चालक वासुदेव सावंत, बाबू दळवी, किशोर सावंत तसेच भजन मंडळाचे प्रदीप रावले यांच्या कार्याचे कौतुक केलं. खजिनदार दीपक तावडे, सहखजिनदार बाबाजी नेरुरकर यांच्या कार्याचेदेखील कौतुक केले. महिला अध्यक्ष प्रिता भोजने यांनी महिलांनी मंडळ कार्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, ही विनंती केली. सभेला मोठ्या संख्येने सदस्य उपस्थित होते.



### विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप

**माणगाव** : सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात आग्रेसर असणाऱ्या जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेने उपनेते निलेश सांबरे यांच्या माध्यमातून तसेच राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेतर्फे सोमवार, दि. ११ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वा. कुणबी भवन हॉल माणगाव येथे आदर्श प्राथमिक विद्यामंदिर उतेखोल-माणगाव शाळेतील ३१७ विद्यार्थ्यांना प्रत्येकी तीन वह्यांप्रमाणे ९५१ वह्यांचे मोफत वाटप शिवसेनेचे युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, जिजाऊ संघटनेचे रायगड व ठाणे जिल्ह्यातील पदाधिकारी अमर राऊत, परेश कारंडे, गौरव खर्चे माणगाव येथील कार्यकर्ते निलेश म्हात्रे, नितीन शेलार, उमेश यादव, विजय बक्कम, विशाल पवार, मिलिंद शेलार, चैतन्य मेथा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विपुल उभारे यांनी आज आपण आदर्श प्राथमिक विद्यामंदिर उतेखोल-माणगाव येथील विद्यार्थ्यांना वह्या वाटप करतोय ही एक नामांकित शाळा असून, तालुक्यात ही शाळा जंगम गुरुजींची शाळा म्हणून प्रसिद्ध आहे. या शाळेतून चांगले विद्यार्थी घडून पुढे हे विद्यार्थी डॉक्टर, वकील, इंजिनिअर, मोठे उद्योगपती व्हावेत, अशी इच्छा व्यक्त केली.

## घोटवडे स्मशानभूमीची वाट बिकट

### आश्वासनाची पूर्तता करण्यास प्रशासन उदासीन





**| अलिबाग| प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील घोटवडे गावालगतच असलेली स्मशानभूमी व दफनभूमी तोडून अन्य ठिकाणी बांधण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले. त्यानंतर ग्रामस्थांनी सामंजस्यपणाने त्याचा स्वीकार केला. परंतु, नव्याने बांधण्यात आलेली स्मशानभूमी व दफनभूमी अपूर्णावस्थेत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला आहे. पाण्यासह विद्युत सेवा व इतर सुविधा नसल्याने प्रचंड गैरसोय होत असल्याचे बोलले जात आहे. घोटवडे स्मशानभूमीची वाट बिकट असून, आश्वासनांची पूर्तता करण्यास प्रशासन उदासीन ठरले आहे.

घोटवडे येथील परंपरागत असलेली दफन व स्मशानभूमीची जागा बळकाविण्याचा प्रयत्न सुरु करण्यात आला होता, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. वैद्यकीय महाविद्यालयासाठी दफन व स्मशानभूमीची जागा घेण्याच्या हालचाली सुरु झाल्याने घोटवडे ग्रामस्थांनी त्याला विरोध केला होता. परंतु, घोटवडे ग्रामस्थांनी सामंजस्य भूमिका घेत प्रशासनाच्या आश्वासनानंतर अन्य ठिकाणी स्मशानभूमी बांधण्यास होकार दिला. त्यानुसार पूर्वपरंपरागत जागेत असलेली स्मशानभूमी व दफनभूमी अन्य ठिकाणी बांधण्यात आली. परंतु, याकडे जाणारी वाट बिकट झाल्याचे दिसून आले आहे. त्याचप्रमाणे स्मशानभूमीचे कामदेखील निकृष्ट दर्जाचे केले आहे, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मागील महिन्यात मृतदेह स्मशानभूमीकडे नेताना चिखलातून वाट काढावी लागली. स्मशानभूमीकडे जाणाऱ्या वाटेच्या दुतर्फा फक्त पत्रा बसविण्यात आला आहे. पावसात हा पत्रा निघाला होता. त्यामुळे खूप अडचण निर्माण झाली होती. पाणी व विद्युत सुविधा नसल्याने गैरसोय झाली. प्रशासनाकडून फसवणूक करण्यात आली असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. स्मशानभूमीचे काम योग्य केले नाही, रस्ता, पाणी, संरक्षित भिंतीचे काम केले नाही, तर तीव्र आंदोलन करणार, अशा इशारा ग्रामस्थांनी दिला.

> **घोटवडे येथील नव्या स्मशानभूमीच्या ठिकाणी कंपाऊंड वॉल बांधणार, पाणी, रस्ता अशा अनेक सुविधा उपलब्ध करून देणार, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले होते. जोपर्यंत नवीन स्मशानभूमी पूर्ण होत नाही, तोपर्यंत जुनी स्मशानभूमी मोडायची नव्हती. नव्याने बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीचे काम निकृष्ट दर्जाचे आहे. स्मशानभूमीची वाट बिकट आहे. याबाबत तेथील एका असिस्टंट जनरल मॅनेजरला विचारणा केली असता, त्यांच्याकडून समाधानकारक उत्तरे दिली नाहीत.**
>
> **– प्रसाद शिंदे, ग्रामस्थ**

> **उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, रेवदंड्याचे पोलीस निरीक्षक यांच्या उपस्थितीत स्मशानभूमीच्या प्रश्नाबाबत बैठक झाली होती. पूर्वीची स्मशानभूमी तोडायची असेल, तर नवीन बांधून द्या, असे ठरले होते. परंतु, नवीन स्मशानभूमी पूर्णतः अपूर्णावस्थेत आहे. पावसाळ्यात खूप त्रास होतो. मृतदेह स्मशानभूमीकडे नेताना अडचण निर्माण होत आहे. रस्ता नाही. वारंवार कंपनीला सांगूनदेखील दुर्लक्ष केले जात आहे.**
>
> **– प्रभाकर खंडागळे, ग्रामस्थ**

## बाप्पाच्या आगमनाची चाहूल

### श्रीगणेश मूर्तीकारांची लगबग

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

गणेशोत्सव अवघ्या पंधरा दिवसांवर आला असून, सर्वत्र बाप्पाच्या आगमनाची चाहूल लागली आहे. गणेश मूर्तीकारांची मूर्ती तयार करण्यात करण्यात लगबग दिसून येत आहे. शहराबरोबरच ग्रामीण भागात आजच्या वाढत्या महागाईतही व्यावसायिक तग धरून आहेत. मुरुड तालुक्यातील मजगाव येथील मूर्तीकार सुनील आयरकर यांच्या श्रीकृपा कला केंद्राला आमच्या प्रतिनिधीने भेट दिली असता त्यांनी मांडलेली आपली व्यथा.

शालेय जीवनापासूनच कलेची आवड होती. शाळा सुटल्यावर व सुट्टीच्या वेळेत मी आवडीने गोविंद गोसावी आणि विलास पालवणकर व बिर्जे यांच्या चित्र शाळेमध्ये जमेल तसे काम करीत शिकलो. गेली ३३ वर्षे श्रीगणेश मूर्ती तयार करण्याचा व्यवसाय करीत आहोत. १९८२ पासून मुरुडचे चलतचित्रकार बबन सुर्वे (फुटाणकर) यांच्या सहकार्याने स्वतः चा गणेशमूर्ती तयार करण्याचा कारखाना सुरु केला. सन १९९२ पासून आतापर्यंत ३३ वर्षे गणेशमूर्ती बनविण्याचे काम करीत आहे. सुरुवातीला पूर्वी १०० टक्के शाडू मातीच्या मूर्ती तयार करण्याचे काम करीत असे. काळानुसार परिस्थितीत झालेला बदल, वाढत्या महागाईमुळे, नवीन पिढीतील युवा वर्ग मूर्तीकामासाठी पुढे येत नाहीत. त्यामुळे गेली पंधरा वर्षे पेण-हमरापूर येथून आम्हाला पीओपीच्या कच्च्या मूर्ती आणाव्या लागत आहेत. दिवसरात्र मेहनत घेऊन याच व्यवसायाचा आधार घेत मुलगा शुभम वकील झाला आहे.महाराष्ट्र राज्य सरकार पीओपी मूर्तीकारांच्या पाठीशी खंबीरपणे राहिल्याने व मुंबई उच्च न्यायालयाने यावरील बंदी उठवल्याने आम्हाला ग्राहकांना शंभर टक्के मूर्ती देता आल्या. यंदा मूर्ती तयार करण्यासाठी लागणारी माती, रंग, कच्च्या मालाच्या किमतीत २५ टक्के वाढ झाली असून, कामगारांच्या पगारात वाढ झाली असल्याने यंदा गणेशमूर्तींच्या किमतीत थोडीफार वाढ करण्यात आली असल्याची माहिती मूर्तीकार आयकर यांनी दिली.



## पोलिसांची जुगार अड्ड्यावर कारवाई

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या विशेष पथकाने शहरातील लक्ष्मी वसाहत येथील अविनाश शिंदे यांच्या छताला पत्रा असलेल्या घरामध्ये धाड टाकून केलेल्या विशेष कारवाईत आठ जणांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून जुगारासाठी वापरलेली रोख रक्कम हस्तगत केली आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांना लक्ष्मी वसाहत येथे बेकायदेशीररित्या जुगार अड्डा चालवून तेथे रोख रक्कमेचा वापर करून १३ पानी पत्ते लावून जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

## पर्यटकांच्या अश्लीलतेला पोलिसी खाक्या दाखवा

### माथेरानमधील महिला दक्षता समिती आक्रमक



**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान शहर पर्यटनस्थळ असल्याने राज्याच्या विविध भागातून तसेच परराज्यातूनदेखील पर्यटक येत असतात. मात्र, त्यातील काही पर्यटक हे शहरातील सार्वजनिक ठिकाणी अश्लील चाळे करतात आणि त्यामुळे महिलांना शरमेने मान खाली घालावी लागते. त्यामुळे अशा पर्यटकांना पोलिसी खाक्या दाखवून शिस्त लावण्याची मागणी महिला दक्षता समितीच्या बैठकीत करण्यात आली. दरम्यान, माथेरान पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अनिल सोनोने यांनी रात्रीच्या वेळी पोलिसांचा राऊंड शहरात सुरू राहील, असे आश्वासन दिले आहे.

माथेरान पोलिस ठाणे अंतर्गत महिला दक्षता समितीची नियुक्ती आणि पहिली सभा पोलिस ठाणे येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी माथेरान पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक आणि प्रभारी अधिकारी अनिल सोनोने यांनी नवनिर्वाचित महिला दक्षता समिती सदस्यांचे स्वागत केले.

माथेरान पोलिस ठाणे दक्षता समितीमध्ये सामाजिक कार्यकर्त्या रेखा चौधरी, वर्षा शिंदे, सोनम दाभेकर, कीर्ती मोरे, सुहासिनी शिंदे, स्वाती कुमार यांची निवड करण्यात आली आहे. या बैठकीला महिला पोलीस कर्मचारी पूनम ठाकरे, निलिमा जाधव आणि स्थानिक गुप्तचर पोलीस दामोदर खतेले हे उपस्थित होते. या बैठकीत महिला दक्षता समितीच्या सदस्यांनी अनेक विषय बैठकीत मांडले. त्यात प्रामुख्याने शहरात येणारे पर्यटक यांच्याकडून सार्वजनिक ठिकाणी केले जाणारे अश्लील चाळे थांबविण्यासाठी काही उपाययोजना करण्याच्या सूचना वर्षा शिंदे यांनी केल्या. त्यात सार्वजनिक ठिकाणी अश्लील चाळे करू नयेत, असे फलक आणि पोलिसांचा गस्त सतत सुरू राहायला हवी, अशी मागणी केली. महिला वर्ग मोठ्या प्रमाणात शहरात पर्यटनासाठी येत असतो आणि दुसरीकडे स्थानिक रहिवाशांनादेखील तरुण-तरुणी यांच्या अश्लील चाळ्यांमुळे मान खाली घालावी लागते, अशी तक्रार शिंदे यांनी केली.

महिला दक्षता समितीच्या सदस्या रेखा चौधरी यांनी शहरात गणेशोत्सव काळात मिरवणुकी वरील कडक नियम शिथिल करण्याची मागणी केली. गणेशोत्सवात निर्बंध लागू करण्याऐवजी नियमावली बनवून गणेशभक्तांना आवाहन करून नियम पाळायला लावा, अशी सूचना केली. शहरातील कायदा सुव्यवस्था याबाबत पोलीस प्रशासन कडक पावले उचलावी जेणेकरून शहरात पर्यटकांकडून कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, अशी अपेक्षा सुहासिनी शिंदे यांनी व्यक्त केली.

## कर्जत स्थानकातील फलाट एकची लांबी वाढणार

**| कर्जत | प्रतिनिधी |**




● (छायाचित्र : संजय गायकवाड)

कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकची लांबी कमी असल्याने जास्त डबे असलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्या दोन वेळा थांबत असल्याने प्रवाशांचे होत असलेले हाल होणार नाहीत. कारण, कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकची लांबी वाढविण्याचे काम फेब्रुवारी २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता असल्याचे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

कर्जत रेल्वे स्थानकावर एकूण तीन फलाट व एक इएमयु फलाट आहे. फलाट क्रमांक एक वर मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या गाड्या येत असतात. परंतु, या फलाटाची लांबी कमी असल्याने जास्त डबे असलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्या दोन वेळा थांबविल्या जातात. त्यामुळे प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे खूप धावपळ व हाल होतात. या गडबडीत अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नुकतेच कर्जत रेल्वे स्थानकावर डब्याची स्थिती दर्शविणारे छोटे इंडिकेटर्स बसविण्यात आले आहेत. दोन वेळा गाडी थांबत असल्याने रेल्वे प्रशासनाला एकाच ठिकाणी डबे दर्शविणारे दोन इंडिकेटर्स बसवावे लागले आहेत. त्यामुळे प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण होतो व कधी कधी गाडी चुकते, तर कधी सामान फलाटावरच राहते.या होणाऱ्या त्रासाबद्दल कर्जत येथील सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे फलाट क्रमांक एकची लांबी त्वरित वाढण्याचे काम पूर्ण करावे, अशी विनंती केली होती. यावर रेल्वे प्रशासकडून सदर कामासाठी ठेकेदाराची नेमणूक केली आहे व सदर कामाला पावसामुळे उशीर होत आहे, असे ओसवाल यांना कळविले होते. ओसवाल यांनी पुन्हा आपला पाठपुरावा सुरूच ठेवला व सदर काम साधारण कधीपर्यंत पूर्ण होईल, असे विचारल्यानंतर सदर काम फेब्रुवारी २०२६ पर्यंत पूर्ण होईल, असे ओसवाल यांना कळविले आहे.

## भीषण अपघातात एक ठार, चौघे गंभीर

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेलजवळील मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर पुणे लेन, कि.मी. ९/६००, च्या हद्दीत रविवारी टोयोटा अर्बन कुजर गाडीवरील चालकाने बलेनो गाडीस पाठीमागून धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, गाडी पलटी होऊन गाडीतील एक जागीच ठार, तर चार जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.

यातील अपघातग्रस्त वाहन टोयोटा अर्बन कुजर कार क. यूपी-३२-एमयू-२२८७ चे चालक नूरभालम खान (३४), रा. आशापूरा, कि. रायबरेली, उत्तर प्रदेश हा चालवत होता. सदर कारमध्ये चालकाव्यतिरिक्त आणखीण तीन इसम व एक महिला होती. ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून मुंबई ते लोणावळा असे जात असताना, कार चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन बेदरकारपणे चालवून, बलेनो कार क्र. एमएच-०९-जीयू-७२४५ हिला पाठीमागून डाव्या बाजूला ठोकर मारली. या अपघातात कार पलटी होऊन झालेल्या अपघातात कारमधील महिला अस्फिया बानू मो. फरीद खान (२२) ही मयत झाली असून, चालक नूरआलम खान, मोहंमद अरबाज मोहंमद अहमद २४, मोहंमद आरीफ मोहंमद आक्षम, २४ व रिजवान २४ हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना पुढील उपचाराकरिता एमजीएम रुग्णालय येथे पाठवण्यात आले आहे.

या अपघाताची माहिती मिळताच म.पो. केंद्र पळस्पेचे अधिकारी व कर्मचारी तसेच पनवेल तालुका पोलीस ठाणे, पनवेल तालुका वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळी जाऊन वाहतूक कोंडी दूर केली. या अपघाताची नोंद तालुका पोलीस ठाण्यात केली आहे.

भारतीय एज्युकेशन/ सोशल चॅरिटेबल ट्रस्ट
शेठ श्री ओटरमल शेषमल परमार
कॉलेज ऑफ डिप्लोमा इंजिनीरिंग
POLYTECHNIC
KJ GROUP "World of Infinite Possibilities!"
Approved by AICTE (Govt of India), DTE Code 3288 (Govt of Maharashtra), Affiliated to M. S. B. T. E
Admission Notice- Academic Year 2025-26
Applications are invited for 1st & Direct 2nd Year post SSC/HSC Engineering (Diploma) course from all eligible candidates for Institute Quota.
1st and Direct 2nd Year Against CAP Admission
1 Civil Engineering
2 Mechanical Engineering
3 Electrical Engineering
4 Computer Engineering
5 Aritificial Intelligence and Machine Learning Engineering
HURRY UP!
Schedule for Institute Quota Admission:-
- Issue of admission form 07/08/2025 to 12/08/2025
- Admission reporting 13/08/2025 to 14/08/2025
- Cost of Admission form/ prospects in Rs 200/-
- Submission of forms & Document verification
For admission schedule details, visit the college website or notice board
LIMITED SEATS!!!
8826011877
Our Recruiters (Campus Placements):-
LARSEN & TOUBRO, POSCO MAHARASHTRA STEEL, JSW Steel, SOLVAY, Reliance Jio, SANY, MITSUBISHI ELECTRIC, UNICHEM LABORATORIES LTD, SELEC Creating Best Value, SUZLON, Armstrong, SPL
College Address : At.Post Nagothane (Velshet), Tal:Roha, Dist: Raigad-402106

**कोकणवासियांची सरकारकडे मागणी** | **वर्षानुवर्षे मंत्र्यांचे पाहणी दौरेच, काम शून्य**

## मुंबई-गोवा महामार्ग लवकर पूर्ण व्हावा



**| माणगाव | सलीम शेख |**

सुंदर असा निसर्ग, समुद्र किनारे, नारळ-आंबा-सुपारी या फळांच्या मोठ्या प्रमाणात असणाऱ्या बागा, फेसाळ धबधबे या गोष्टींमुळे कोकणात येण्याचा पर्यटकांचा ओघ वाढला आहे. या पर्यटकांचा प्रवास सुखकर होण्यासाठी कोकणतील मुंबई-गोवा महामार्ग या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण होणे गरजेचे आहे. हे काम पूर्ण झाल्यास अधिकतम पर्यटकांची संख्या वाढवून निसर्ग सौंदर्य लाभलेल्या या कोकणच्या वैभवात निश्चितच भर पडेल. तसेच वाढत्या पर्यटकांमुळे पर्यटनाला चालना मिळून कोकणवासियांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

महायुती सरकारच्या काळात समृद्धी महामार्ग, अटल सेतू यांसारखे रस्ते झाले, मात्र मुंबई-गोवा महामार्गाकडे दुर्लक्षच झाले आहे. या महामार्गाचे काम जवळपास १७ वर्षे रखडले आहे. या महामार्गावर दैनंदिन लहान-मोठे अपघात होत असतात. आजपर्यंत हजारो लोकांचे जीव गेले आहेत. अनेकजण जखमी झाले असून, अनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे. गणेशोत्सव काळात कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना यंदाही खड्ड्यांतूनच जावे लागणार आहे.

> **फक्त तारीख पे तारीख**
>
> मुंबई, पुण्याहून तसेच परदेशातून येणारे पर्यटक हा कोकणच्या शेवटच्या टोकापर्यंत सिंधुदुर्ग, रत्नागिरी, गोवापर्यंत पर्यटनाला जात असतो. कोकणातील हिरवीगार झाडे-झुडपे यांच्याबरोबरच श्रीक्षेत्र हरिहरेश्वर, दिवेआगर, मुरुड, अलिबाग, श्रीवर्धन, गोवा येथील समुद्रातील फेसाळ लाटा यांचा मनमुराद आनंद बीचवर पर्यटक घेत असतात. शिवाय गणपतीपुळे, अष्टविनायक यांसारखी अनेक प्रसिद्ध देवस्थाने यांमुळे पर्यटकांचा जोर कोकणात वाढला आहे. कोकणाची ही शान कायम राहण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम लवकर पूर्ण होणे आवश्यक आहे. परंतु, या कामासाठी फक्त नव्या-नव्या तारखा देण्यात येत आहेत.

> **दर्जेदार काम व्हावे**
>
> या महामार्गाचे काम मार्गी लागून दर्जेदार रस्त्याचे काम झाल्यास अपघातांना तर आळा बसेलच, शिवाय कोकणच्या सौंदर्यात आणखी भर पडेल. हा महामार्ग सध्याच्या घडीला जीवघेणा महामार्ग बनला असून, लोकांचा प्रचंड आक्रोश आहे. मात्र, याकडे महायुती सरकारला लक्ष द्यायला वेळ नाही, असा आरोप कोकणवासियांकडून होत आहे. राज्यभरात मोठ मोठे महामार्ग बनविले जात असताना, मुंबई-गोवा महामार्ग रखडल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.

## मोदींना जेव्हा जाग येते

डोनाल्ड ट्रम्प हा एक अत्यंत मूर्ख व भंपक इसम आहे. पूर्वीच्या काळातल्या मराठी सिनेमातल्या दुष्ट सरपंचाचे सर्व अवगुण त्यांच्यात एकवटले आहेत. हातातील सत्तेच्या बळावर सगळ्यांना उठसूठ धमक्या देणे, उघडपणे खोटारडेपणा करणे, बायकांच्या भानगडी करणे वगैरे सर्व गोष्टी या ट्रम्पमहाशयांना लागू होतात. मराठी सिनेमातले सरपंच एखाद्या तमासगीर बाईसाठी वेडे होत. तसे हे वॉशिंग्टनचे सरपंच नोबेल पारितोषिकासाठी पागल झाले आहेत. ओबामाला मिळाले तर मलाही नोबेल मिळालेच पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. जगातली सर्व युध्दे मी थांबवली असे दाखवले तर आपल्याला हा पुरस्कार मिळेल असे त्यांना वाटते. गेल्या काही दिवसांपासून भारत त्यांच्या कचाट्यात सापडला असून त्यांनी आजवर अनेकदा अपमान केला आहे. भारत आणि पाकिस्तानचे युध्द मीच थांबवले असा दावा पुन्हा पुन्हा करत असतात. दुर्दैवाने आपले स्वतःला विश्वगुरु समजणारे नरेंद्र मोदी यावर मूग गिळून गप्प बसले आहेत. पाकिस्तान आणि देशातील विरोधी पक्षनेते यांच्याबाबत बोलताना मोदींना मोठे स्फुरण चढते. पण ट्रम्प यांच्यापुढे त्यांची बोलती बंद झाली होती. अगदी आजतागायत ट्रम्प हे खोटारडे आहेत व पाकिस्तानबरोबरच्या युध्दबंदीशी त्यांचा काहीही संबंध नाही असे मोदींनी ठणकावून सांगितलेले नाही. जगातील कोणत्याही देशाच्या नेत्याने भारताला युध्द बंद करण्यास सांगितलेले नव्हते असा आडवळणी उल्लेख त्यांनी संसदेत केला, तेवढेच. याच ट्रम्पनी सगळ्या जगावर आयातशुल्क उर्फ टॅरिफचा बडगा उगारला आहे. भारताला कोंडीत पकडण्यासाठी त्यांनी रशियासोबतच्या आपल्या व्यापाराचा मुद्दा उपस्थित केला व आधी २५ टक्के व दोन दिवसांनी आणखी २५ टक्के असे एकूण ५० टक्के आयातशुल्क लावून टाकले. यामुळे भारतातून अमेरिकेला निर्यात होणाऱ्या सर्व वस्तू ५० टक्क्यांनी महाग होतील. हे झाल्यावर मोदी सरकारला अखेर जाग आली व त्यांनी थोडे निषेधाचे सूर काढले. युक्रेन युध्द सुरु झाल्यानंतर अमेरिका व युरोपने रशियावर निर्बंध घातले. रशियाकडून काहीही वस्तू घ्यायच्या नाहीत असे ठरवले. पण भारत, चीन यासारख्यांनी त्याचा फायदा उठवला. रशियाकडून क्रूड तेलाची मोठी आयात सुरू केली.

### तेलाचे राजकारण

युक्रेन युध्दापूर्वी आपण रशियाकडून केवळ दोन टक्के तेल आयात करीत होतो. आता आपल्या एकूण आयातीपैकी तब्बल ३५ टक्के तेल रशियातून येते. हे तेल आपल्याला बाजारभावापेक्षा एका बॅरलमागे दहा ते बारा डॉलरने स्वस्त मिळते. कच्चे तेल येथे आणून तेलशुद्धीकरण कारखाने त्यातून पेट्रोल, डिझेल व प्लास्टिकचे पदार्थ करण्याची सामग्री तयार करीत असतात. हे आयात करणाऱ्या सरकारी कंपन्या आहेत तशाच मुकेश अंबानींची रिलायन्सही आहे. किंबहुना, रिलायन्सला हे तेल स्वस्तात मिळाल्याने गेल्या वर्षभरात ६०० कोटी डॉलर्सचा फायदा झाला. कारण हेच स्वस्तातले तेल शुद्ध करून रिलायन्सने जगाच्या बाजारात महागात विकले. अर्थात, यात गंमत अशी की, मूळ रशियातले असलेले तेल रिलायन्सच्या मार्फत आल्याने युरोप व इतर देशांनी आरामात स्वीकारले. ट्रम्प यांनी याचविषयी राग व्यक्त केला असून भारताला दंड म्हणून मूळ २५ टक्क्यांवर आणखी २५ टक्के कर लागू केला आहे. युक्रेन युध्दात रशियाने किती माणसे मारली वगैरे ट्रम्प सांगत असून भारत अशा रशियाला पैसे कसे देतो असा सवाल करीत आहेत. हा दांभिकपणाचा कळस आहे. पॅलेस्टिनींविरुध्दच्या युध्दात इस्रायलने गाझामध्ये ५० हजार लोकांना ठार मारले. आतादेखील त्याने पॅलेस्टिनी गरिबांचे खाणेपाणी तोडले आहे. या इस्रायलला सर्वात जास्त विमाने व बॉंब अमेरिकेने दिले. इराणविरुध्दच्या युध्दात इस्रायल हरू लागल्यावर अमेरिकेने इराणवर बॉंब टाकले. तिथे माणसे मारली. त्यापूर्वी जगभर सीआयएमार्फत सरकारे उलथली. भारतात देखील कारवाया केल्या. आणि त्या अमेरिकेचा अध्यक्ष भारताला युध्दाला मदत करणारा ठरवत आहे. अर्थातच ट्रम्प यांचा अनेक प्रकारचा स्वार्थ यात गुंतलेला आहे. त्यांना खरे तर रशियावर दडपण आणायचे आहे. आपण सत्तेत आलो की चोवीस तासात युक्रेन युध्द थांबवू अशी डरकाळी त्यांनी फोडली होती.

### स्वार्थ हाच परमोच्च

ट्रम्प यांनी यासाठी रशियाचे अध्यक्ष पुतीन यांना लोणी लावण्याचा बराच प्रयत्न केला. त्यांच्याशी फोनवरून बातचीत केली. युक्रेनचा रशियाने जिंकलेला भाग आता त्याच्याकडेच राहील असे युक्रेनला परस्पर सांगितले. युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्कीचा अपमान केला. पण रशिया युध्द थांबवायला तयार नाही. युक्रेनच्या आडून युरोप व अमेरिका आपल्यावर पुढेमागे हल्ला करतील अशी भीती पुतीन यांना वाटते. त्यासाठी त्यांना युक्रेन पूर्णपणे आपल्या ताब्यात हवे आहे. यामुळे ट्रम्प यांच्या बेतांवर मात्र पाणी पडले आहे. त्यामुळे रशियावर दबाव आणण्यासाठी ते त्याच्याकडून तेल वगैरे घेणाऱ्या भारताला कोंडीत पकडत आहेत. वास्तविक भारताच्या कित्येक पटीने अधिक तेल रशियाकडून चीन घेत असतो. पण चीनला हात लावण्याची हिंमत ट्रम्प दाखवू शकत नाही. चीनच्या लष्करी व आर्थिक ताकदीचा हा परिणाम आहे. मोदी सरकारने आता थोडी धावाधाव सुरु केली आहे. रशियाकडून तेलाची आयात चालूच राहील असे निदान जाहीरपणे तरी सांगितले आहे. पुतीन हे लवकरच भारत भेटीसाठी येणार असल्याचेही जाहीर केले आहे. आपले सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी त्यांची मॉस्कोत जाऊन भेट घेतली. शिवाय आता शांघाय सहकार्य परिषदेसाठी मोदी चीनला जाणार असून तेथे शि जिनपिंग यांच्यासोबत त्यांची भेट होण्याची शक्यता आहे. अमेरिकेच्या विरोधात रशिया, भारत व चीन असे एकवटत असल्याचे दर्शवण्यासाठी हे सर्व प्रयत्न चालू आहेत. अर्थात यापैकी कोणीच एकमेकांचा भरवसा देऊ शकत नाही. कारण, ट्रम्प आणि पुतीन १५ ऑगस्टला भेटत आहेत. चीनसोबत अमेरिकेची चर्चा स्वीडनमध्ये चालू असून ती उत्तम प्रगती करीत आहे असे ट्रम्प म्हणत आहेत. शी जिनपिंग यांची लवकरच भेट घेऊ असेही ते सांगत आहेत. दुसरीकडे भारताने अमेरिकेकडून शस्त्रे खरेदी करणे थांबणार नाही असे सांगितले आहे. शिवाय व्यापार करार करण्यासाठी अमेरिकेला आणखी कोणत्या सवलती देता येतील याची चाचपणी चालू आहेच. मका, कापूस, सोयाबीन आणि दुधाचे पदार्थ भारताला निर्यात करता यावेत यासाठी अमेरिकेचे प्रयत्न आहेत. अर्थातच ते आपल्या शेतकऱ्यांवर घाला घालणारे ठरेल. मोदी सरकारने तूर्त तरी हा आग्रह रोखून धरला आहे. पण मागच्या दाराने अमेरिकेला काही सवलती दिल्या जाणारच नाहीत असे सांगता येत नाही. असो. ट्रम्प यांच्या बऱ्याच थैमानानंतर मोदींच्या भारताला स्वाभिमानाची जाणीव झाली हेही नसे थोडके.

विचार

# भारत-अमेरिका दुराव्याचा पाकला फायदा?

***भारत आणि अमेरिकेत सध्या दुरावा आहे. भारताला शह देण्यासाठी अमेरिकेने आता पुन्हा पाकिस्तानला जवळ करण्याचे ठरवले आहे. जागतिक सत्ता संतुलनाच्या समीकरणात त्यामुळे बदल होण्याची शक्यता आहे. अमेरिका पाकिस्तानला जशी जवळ घेईल, तसा पाकिस्तानपासून चीन दुरावण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर भारतावर त्याचा काय परिणाम होईल, हे जाणून घेतले पाहिजे.***



प्रा. जयसिंग यादव

२०१९ मध्ये अमेरिकेतील टेक्सास येथे झालेल्या ‘हाउडी मोदी’ कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या संदर्भात ‘अबकी बार ट्रम्प सरकार’चा नारा दिला. पुढच्या वर्षी ट्रम्प भारतात आले, तेव्हा अहमदाबादमध्ये त्यांच्या स्वागतासाठी ‘नमस्ते ट्रम्प’ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ट्रम्प आणि मोदी यांची वैचारिक नाळ जुळली आहे, दोघे परस्परांचे मित्र आहेत, असे चित्र जगभर रंगवले गेले. २०२४ मध्ये पंतप्रधान मोदी तिसऱ्यांदा सत्तेत आले, तर ट्रम्प हे ही चार वर्षांनंतर पुन्हा सत्तेत आले. माध्यमांनी पुन्हा दोन्ही नेत्यांमधील संबंधांच्या दृष्टिकोनातून भारत-अमेरिका संबंधांकडे पाहण्यास सुरुवात केली; परंतु गेल्या सुमारे सहा महिन्यांमध्ये असे दिसते की, दोन्ही नेत्यांमधील संबंध पूर्वीसारखे राहिलेले नाहीत. अध्यक्ष झाल्यानंतर ट्रम्प यांनी अनेक देशांवर शुल्क म्हणजेच व्यापार शुल्क लादण्याची घोषणा केली. त्यात त्यांचा भारतावर अधिक रोष आहे. भारत जगात सर्वाधिक आयात शुल्क आकारतो, असा आरोप त्यांनी वारंवार केला आहे. अमेरिकेने भारताला रशियाकडून एस-४०० क्षेपणास्त्र खरेदी करू नका, असे सांगितले होते; परंतु भारताने अमेरिकेला न जुमानता रशियाकडून ही क्षेपणास्त्रे खरेदी केली. युक्रेन-रशिया युद्ध सुरू झाल्यानंतर अमेरिका आणि ‘नाटो’ने रशियावर अनेक निर्बंध लादले. हे निर्बंध धुडकावून भारत आणि चीनने रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी सुरू केली. भारताला रशियातून स्वस्तात कच्चे तेल मिळते. भारतीय कंपन्यांनी रशियातून कच्चे तेल खरेदी करून, त्यावर प्रक्रिया करून जगातील अनेक देशांना विकले. यामुळे अमेरिकेचा तिळपापड झाला आहे.

रशिया आणि अमेरिकेत सध्या तणावाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर ही भारताने रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे सुरूच ठेवले आहे. ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के शुल्क लावण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतरही भारताने रशियाशी मैत्रीसंबंध पूर्वीसारखेच राहतील, असे जाहीर केल्यामुळे ट्रम्प यांचे पित्त खवळले. याच वळणावर अमेरिकेने पाकिस्तानसोबत तेलाचे साठे विकसित करण्यावर करार केला. अर्थात पाकिस्तानला ते इतक्या सहजासहजी करता येणार नाही. त्याचे कारण हे साठे बलुचिस्तान प्रांतात आहेत आणि तिथे आता बंडखोरांची सत्ता चालते. अमेरिका आणि पाकिस्तानच्या करारानंतर बलुचिस्तानमधून या कराराविरोधात भाष्य व्हायला लागले आहे. ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के कर लादल्यामुळे अल्पकालीन काळात निर्यात निश्चितच कमी होईल. निर्यातदारांचे उत्पन्नही कमी होईल. त्याचा दीर्घकालीन परिणाम अधिक महत्त्वाचा आहे, कारण जर हे शुल्क एका वर्षापेक्षा जास्त काळ असेच राहिले, तर पुरवठा साखळीत बदल होऊ शकतो. पहलगाम हल्ल्यानंतर ट्रम्प यांनी आगाऊपणा केला. ‘ऑपरेशन सिंदूर’ आपणच थांबवायला भाग पाडले, असे त्यांनी वारंवार सांगितले. त्यामुळे विरोधकांच्या हाती आयते कोलित आले. विरोधकांनी प्रश्न उपस्थित केला, की तुम्ही द्विपक्षीय बाबींमध्ये अमेरिकेचा हस्तक्षेप कसा होऊ दिला? विशेषतः संरक्षण बाबींमध्ये नेहमीच कठोर भूमिका घेणाऱ्या भाजपला बॅकफूटवर जावे लागले. पंतप्रधानांना संसदेत स्पष्टीकरण द्यावे लागले.

अमेरिकेला भारताकडून हवे आहे, ते भारत देऊ शकत नाही. ट्रम्प यांना वाटते की अमेरिकेच्या कृषी उत्पादनांसाठी भारताने दरवाजे खुले केले पाहिजेत. भारताने या उत्पादनांवर आधीच कर लादून भारतीय शेती क्षेत्र संरक्षित केले आहे. याशिवाय मांसभक्षक अमेरिकन गाईंचे दूध आणि दुग्धजन्य पदार्थ भारतात येऊ द्यायला अनेकांचा विरोध आहे. हा प्रश्न भावनिक झाला असून अमेरिकेशी असणाऱ्या मैत्रीसाठी भाजप आपली मतपेढी दुखावू शकत नाही. ट्रम्प यांचा झालेला सत्कार, त्यांना मिळालेली वागणूक यामुळे त्यांचा असा समज झाला की आपण म्हणू ते मोदी करतील; परंतु तसे झाले नाही. त्यामुळे त्यांचे पित्त खवळले. ट्रम्प यांनी ज्या प्रकारे भारतावर शुल्क लादले आहे आणि रशियाकडून तेल आणि संरक्षण उपकरणे खरेदी केल्याबद्दल दंड लावला आहे, तो एक प्रकारे आपल्या सार्वभौमत्वावर हल्ला आहे. आपण कुठून काय खरेदी करावे हे अमेरिका कसे सांगू शकते? इराणसोबत व्यवसाय केल्याबद्दलही अमेरिकेने सहा भारतीय कंपन्यांवर बंदी घातली आहे. एकीकडे भारत आणि अमेरिका संबंधांमध्ये कटुता येत असताना अमेरिका आणि पाकिस्तानमध्ये तेलाच्या साठ्यांबाबत करार झाला. दोन्ही देशांमधील व्यापार कराराचीही चर्चा झाली. पाकिस्तानमध्ये या कराराचे स्वागत केले गेले आहे. त्या देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी हा एक अतिशय महत्त्वाचा करार आहे. अमेरिका आणि इतर देशांसोबतच्या राजनैतिक संबंधांसाठीही हा एक मोठा विजय मानला जात आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये पाकिस्तानची अर्थव्यवस्था खूप वाईट परिस्थितीतून गेली आहे आणि आता सरकार दावा करत आहे की ती ‘टेकऑफ पोझिशन’वर आली आहे. या प्रसंगी पाकिस्तानी निर्यातीला चालना मिळाली, तर पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला मोठा आधार मिळेल. गेल्या २० वर्षांपासून किंवा त्याहूनही अधिक काळ पाकिस्तान सरकार विविध खासगी कंपन्या आणि देशांना तेलाच्या साठ्यावर किंवा वायूच्या साठ्यावर काम करण्यासाठी आवाहन करत होते; परंतु सुरक्षेच्या कारणास्तव आणि तंत्रज्ञानामुळे किंवा इतर कारणांमुळे कंपन्या येत नव्हत्या. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी पाकिस्तानला आश्वस्त केले आहे. एखादी मोठी अमेरिकन कंपनी त्यांच्या तंत्रज्ञानासह आली, तर ती त्यांच्याकडे असलेल्या तेल आणि वायूच्या साठ्यांचा शोध घेण्यासाठी खूप उपयुक्त ठरेल. याचा अर्थ असा की, गेल्या वीस वर्षांपासून पाकिस्तान सामना करत असलेले ऊर्जा संकट सोडवण्यास मदत होईल. पाकिस्तान सरकार हा आपला राजनैतिक विजय म्हणूनही साजरा करत आहे. दरम्यान, अधिक शुल्क लादण्यात आल्याचा फटका भारतीय वस्त्रोद्योगासह अन्य उद्योगांना बसणार आहे. त्याचा फायदा पाकिस्तान आणि बांगलादेशमधील कापड उद्योगाला होईल. पाकिस्तानच्या निर्यातीत कापड उद्योगाचा वाटा ऐंशी टक्के आहे. ‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये भारताचा विजय झाला असला, तरी पाकिस्तान मात्र आपलाच विजय झाल्याचा दावा करतो. आता तर त्याने राजनैतिक आघाडीवरही भारताचा पराभव केला आहे, असे सांगायला सुरुवात केली आहे. भारताची विमाने पाडल्याचे सांगत ट्रम्प यांनी पाकिस्तानची तळी उचलून धरली.

अमेरिकेत सरकारी तेल कंपन्या नाहीत. तिथल्या सर्व कंपन्या खासगी आहेत, मग कोणत्या कंपनीने हा करार केला आणि कधी केला, असा प्रश्न उपस्थित केला जातो. अमेरिका आणि पाकिस्तान जगाच्या डोळ्यात धूळफेक करत असल्याचा सूर तज्ज्ञांनी लावला आहे. कोणत्याही कंपनीने कोणताही करार केलेला नाही. ट्रम्प काहीही बोलतील आणि कंपन्या पाकिस्तानात येतील, असे अजिबात घडणार नाही. अमेरिकन सरकार पाकिस्तानमध्ये जाऊन काम करण्याचा आपला हेतू व्यक्त करू शकते; पण कंपन्या सुरक्षित वातावरण असतील तरच जातील. बलुचिस्तानमध्ये काम करणे किती अवघड आहे, याचा अनुभव चीनी कंपन्यांना आला आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकन कंपन्या हे कच्च्या तेलाच्या संशोधनासाठी बलुचिस्तानमध्ये कितपत येतील, याबाबत साशंकता आहे. पाकिस्तान काही काळापासून म्हणत आहे की त्यांच्याकडे गॅस आणि तेलाचे मोठे साठे आहेत. म्यानमार आणि बांगलादेश अनेक वर्षांपासून म्हणत आहेत की त्यांच्याकडे मोठे साठे आहेत; परंतु आंतरराष्ट्रीय कंपन्या ते प्रमाणित करेपर्यंत हे साठे वैध नाहीत. या कंपन्या वैज्ञानिक आधारावर ते प्रमाणित करतात आणि संपूर्ण जग तो डेटा पाहू शकते. अजून असे काहीही घडलेले नाही.

**(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)**

चर्चा आजची

## चांगल्या रुग्ण सेवेची प्रतिक्षा कधी संपणार

प्रमोद जाधव

अपुऱ्या मनुष्यबळाअभावी जिल्हयातील सरकारी दवाखान्यांमध्ये कंत्राटी डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे. बाह्यरुग्ण कक्षापासून शस्त्रक्रिया व रुग्णांवर उपचार करण्यापासूनची कामांची जबाबदारी कंत्राटी डॉक्टरांवर सोपविण्यात आली आहे. परंतू जिल्ह्यातील सरकारी दवाखान्यातील काही कंत्राटी डॉक्टर फक्त हजारे लावण्यापुरता रुग्णालयात येऊन महिन्याला मानधन घेऊन जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. रुग्णांना चांगल्या सेवेची प्रतिक्षा लागून राहिली आहे.त्यामुळे रुग्ण प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन रुग्णांना चांगली सेवा मिळावी, यासाठी प्रयत्न करावा. अन्यथा सरकारने भरती करून पुर्ण वेळ तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करावी, अशी मागणी होत आहे.

पुर्वी सरकारी दवाखान्यात पुर्णवेळ डॉक्टर असायचे. हळूहळू रुग्णालयातील काही डॉक्टरांनी स्वतःचा व्यवसाय सुरु केल्याने सरकारी दवाखान्यात येणे बंद झाले. त्यामुळे सरकारी दवाखान्यात डॉक्टरांची कमतरता निर्माण झाली. रुग्णांच्या संख्येत वाढ झाली. परंतु डॉक्टर नसल्याच्या तक्रारी वाढू लागल्या. रुग्णांवर वेळेवर उपचार व्हावेत म्हणून शासनाने कंत्राटी डॉक्टरांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला. शस्त्रक्रीया व इतर उपचारासांठी त्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या कामानुसार मानधन ठरविण्यात आले. त्यामुळे जिल्हा रुग्णालयासह अन्य सरकारी रुग्णालयात आता तज्ञ डॉक्टर उपलब्ध झाल्याची आशा प्रफुल्लीत झाली होती. परंतु ही आशा काही काळच टीकून राहिल्याचे चित्र सध्या आहे. काही कंत्राटी डॉक्टरांनी आपला खासगी व्यवसाय सांभाळत फक्त हजेरी पुरता सरकारी दवाखान्यात येण्यावर भर दिल्याने रुग्णांना तज्ञ डॉक्टर वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी वाढू लागल्या. सर्वसामान्य रुग्णांना चांगली सेवा मिळावी,रायगड जिल्हयामध्ये अलिबागमध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय, पेण, मुरूड, कर्जत, पेण, माणगाव, रोहा, श्रीवर्धन आदी तालुक्यांमध्ये उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालय बांधण्यात आले. अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालय २५० खाटांचे आहे. पोलादपूरच्या टोकापासून पनवेल, श्रीवर्धन अशा अनेक भागातून रुग्ण उपचारासाठी येतात. रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे कार्यरत डॉक्टरांना उपचार करताना अडचणी निर्माण झाल्या.अलिबागमधील जिल्हा रुग्णालयासह ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयात कंत्राटी डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे. १६८ डॉक्टरांना कंत्राटी स्वरुपात भरती करण्यात आले. त्यात जिल्हा सामान्य रुग्णालयात २८ डॉक्टरांचा समावेश आहे. जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या देखरेखेखाली कारभार चालला जातो. शस्त्रक्रियेपासून वेगवेगळ्या उपचाराची माहिती घेऊन दर महिन्याला कंत्राटी डॉक्टरांना मानधन दिले जाते. मात्र यातील काही डॉक्टर शस्त्रक्रियेपासून बाह्य रुग्ण कक्षातदेखील हजर नसल्याची चर्चा आहे.

फक्त संध्याकाळी हजेरी लावण्यापुरता रुग्णालयाला भेट देतात. अन्य वेळेला. त्यांचा खासगी दवाखाना चालविण्यामध्ये ते मग्न असल्याचे बोलले जात आहे. बाह्यरुग्ण कक्षामध्ये शिकाऊ डॉक्टर अथवा परिचारिकांमार्फत काम चालविला जात आहे. शस्त्रक्रियेसाठी डॉक्टर नसल्याची चर्चादेखील रुग्णालयांमध्ये सूरू आहे. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना सरकारी दवाखान्यात उपचार न देता त्यांना खासगी डॉक्टर त्यांच्या खासगी दवाखान्यात बोलावून उपचार देत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. कंत्राटी डॉक्टरांच्या मानधनावर लाखो रुपये खर्च केले जातात. मानधन शासनाकडून घेत असताना काही डॉक्टर मात्र त्यांच्या खासगी दवाखान्यातून कारभार चालवित असल्याची माहिती समोर येत आहे. जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना बाहेरील खासगी मेडीकलमधील औषधे लिहून दिल्याचा प्रकार मागील काही महिन्यापुर्वी उघडकीस आला. हा गोरखधंदा स्थानिकांनी समोर आणून जिल्हा शल्यचिकित्सकांच्या निदर्शनास आणून दिला होता. आता शासनाचे मानधन घेऊन खासगी दवाखाना चालविणाऱ्या डॉक्टरांविरोधात यंत्रणा काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे. या डॉक्टरांची नावे लवकरच उघड केली जाणार आहेत. सरकारी दवाखान्यातील रुग्णांना तज्ञ डॉक्टरांची प्रतिक्षा कायमच असते. डॉक्टर वेळेवर येऊन उपचार करतील, मार्गदर्शन करतील या आशेवर आजही अनेक रुग्ण आहेत. अलिबागसह जिल्ह्यातील रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना चांगली सेवा मिळावी, म्हणून काही कंत्राटी स्वरुपात डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र यातील काही डॉक्टर मानधन शासनाचे घेत असले, तरी त्यांचे रुग्ण खासगी दवाखान्यात उपचार घेत असल्याची चर्चा सध्या जोरात सुरु आहे. रुग्णालयातील या कारभाराबाबत चर्चेला उधाण आले आहे. जिल्हा शल्यचिकित्सक या डॉक्टरांच्या कारभाराबाबत काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

लोकसंसद

## प्रवास सुरक्षित होवो ही गणपती बाप्पाच्या चरणी प्रार्थना!

जसजसे गणपती बाप्पाच्या आगमनाचे वेध लागतात तसेतसे मराठी मनामनात आनंदाचे तरंग उमटू लागतात. विशेषतः कोकणवासीय आणि गणेशोत्सव हे जिव्हाळ्याचे अतूट असे एक बंधन आहे. गणपती बाप्पाच्या या आनंदोत्सवासाठी मुंबई, ठाणे व परिसरातील इतर महानगरांतील कोकणवासीय आपल्या गावाकडे कूच करतात. पण हा आनंदाचा आणि श्रद्धेचा सण साजरा करण्यासाठी गावाला जाताना आणि बाप्पाला निरोप दिल्यानंतर मुंबईला परत येताना कोकणवासीयांना एक मोठे दिव्य पार पाडावे लागते आणि ते दिव्य म्हणजे मुंबई-गोवा महामार्गावरचा प्रवास! या महामार्गावर या काळात साडेसहा हजाराहून अधिक अपघातात झाले आणि दोन हजारांपेक्षा अधिक निष्पाप जीव प्राणास मुकले. हजारो लोक कायमचे जायबंदी झाले. आजही महामार्गावरील खड्ड्यांमुळे रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून ठिकठिकाणी अर्धवट अवस्थेत असलेले उड्डाणपूल, तुटलेले दुभाजक अशी परिस्थिती आहे. त्यामुळे सालाबादप्रमाणे यंदाही गणपती बाप्पाचा उत्सव साजरा करण्यासाठी, जीव मुठीत धरून या महामार्गावरून जाणाऱ्या भक्तांचा प्रवास सुखाचा आणि सुरक्षित होवो अशी गणपती बाप्पाच्या चरणी प्रार्थना करणे एवढेच आपल्या हाती आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## विरोधी पक्ष सक्षम असावा!

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या आपल्या देशात द्विपक्षीय प्रणाली आहे एक सत्ताधारी व दुसरे विरोधी पक्ष.यांची निवड लोकांमधून निवडणूक आयोगाच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या निवडणुकीतून होते. सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवणे, त्यांच्या चुकीच्या निर्णयावर बोट ठेवणे आणि जनहितासाठी आवाज उठवणे हे विरोधी पक्षाचे काम आहे. सध्याची स्थिती पाहता विरोधी पक्ष केवळ आणि केवळ सत्ताधारी पक्षावर बिनबुडाचे आरोप करत आहे. राष्ट्रहिताच्या विरोधात बोलताना आणि वागताना दिसत आहे. देशाच्या सुरक्षेसाठी जीवावर उदार होऊन लढणाऱ्या सैनिकांविषयी अपमानास्पद विधाने केली जातं आहेत. त्यांच्या राष्ट्रनिष्ठेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला जात आहे. सध्या ईव्हीएम मशीनच्या संदर्भात सर्वात मोठ्या पक्षाचे नेते आणि ज्यांना राजकीय धुरंदर असे म्हटले जाते ते ईव्हीएम मशीन वर अक्षेप घेत आहेत. निवडणूक जिंकली की ईव्हीएम बरोबर आहे आणि ती हारली तर ईव्हीएम मुळेच हरली असे सर्वत्र सांगितले जाते. देशात विरोधी पक्ष हा सक्षम असावा.

**- लीना मकरंद गाडगीळ, पनवेल**

दिनविशेष

## आंतरराष्ट्रीय युवा दिवस

प्रत्येक देशाचे भविष्य हे त्या देशाच्या युवकांच्या हाती असते. आज तयार होणाऱ्या रचनेचे पालन करुन हे तरुण ज्या दिशेने काम करतात त्याच दिशेने देशाची वाटचाल होत असते. संयुक्त राष्ट्रांनी जागृती दिन म्हणून स्थापन केलेल्या ‘आंतरराष्ट्रीय युवा दिना’ मध्ये युवकांच्या आजुबाजुला घडणाऱ्या सांस्कृतिक आणि कायदेशीर समस्यांकडे लक्ष वेधण्याचा हेतू असतो. त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर १२ ऑगस्ट हा दिवस ‘आंतरराष्ट्रीय युवा दिन’ म्हणून साजरा केला जातो.



दरवर्षी या दिनाच्या निमित्ताने युवकांशी निगडीत असणाऱ्या अनेक मुद्द्यांवर, घटकांवर आणि भविष्यातील आव्हांनावर चर्चा घडवून आणली जाते. यावर्षीचे घोषवाक्य ङ्गजागतिक चळवळींसाठी युवकांचा सहभाग असे निश्चित करण्यात आले आहे. स्थानिक, राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवरील तरुणांचा सहभाग हा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थामध्ये वाढावा तसेच, युवकांचे प्रतिनिधित्व आणि गुंतवणूक ही संस्थातत्मक राजकाराणासाठी कशी पुढे नेता येईल याचे धडे अशा मुद्द्यांवर घोषवाक्य भर देते. युवकांचा स्थानिक, राष्ट्रीय आणि जागतिक संस्थांमध्ये अधिक समावेश करुन जागतिक पातळीवरील आव्हाने साध्य करण्यासाठी त्यांना अधिक सक्षम करणे हा यावर्षीचा मानस आहे. आंततराष्ट्रीय स्थरावर आणि वाढत्या ध्रुवीय जगाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय शासन प्रणाली सध्या अनेक आव्हानांना तोंड देत आहे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीची क्षमता बळकट करण्याची युवकांना पुढाकार घेणे गरजेचे आहे. दहशतवाद, आपत्कालीन परिस्थिती, हवामान बदल आणि असे अनेक मुद्दे हेच तरुण पिढीचे लक्ष्य आहे. येणाऱ्या काळ तंत्रज्ञानासोबतच दुप्पट आव्हाने घेऊन येणारा आहे आणि त्याचे पडसाद आतापासूनच पाहायला मिळतात. आजची तरुण पिढी ही ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि प्रयोगाच्या विश्वात वावरणारा आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगातील अनेक समस्यांची उत्तरे शोधण्याची क्षमता त्याच्यात आहे. मानवी मुल्ये आणि विकासाबाबत त्याला चांगली जाण आहे. शिवाय त्याविषयीची मागणी करण्यासाठी ही पिढी सतत सक्रिय असते. युवकांच्या या क्षमतेला आंतरराष्ट्रीय व्यासपिठाची जोड देऊन बदल नक्कीच घडवता येईल. जागतिक युवा दिनाच्या निमित्ताने या भूमिकेबाबत चर्चा होणे आणि त्यादिशेने युवकांचा सहभाग वाढणे तेवढेच महत्त्वाचे आहे. सर्व वयोगटातील लोकांना एकत्र घेऊन चालणे तसेच वयानुसार लोकांमध्ये होणारा भेदभाव संपवणे, ज्यामुळे युवा पिढी आणि ज्येष्ठ पिढी दोघांवरही परिणाम होतो. असा भेदभाव संपवणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. त्याशिवाय तरूण पिढीचा आवाज, त्यांचे प्रयत्न आणि ते करत असलेले कार्य ओळखून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याची संधी देणे यासाठीही आंतरराष्ट्रीय युवा दिवस महत्वाचा ठरतो.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे
१२ ऑगस्ट
१) श्री.गणेश रामचंद्र पाटील
श्रीबाग-२, अलिबाग, १२-८-१९५८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन





अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**स्व. डॉ. भास्कर त्रिंबक तांबोळी, स्मृतिदिन, अलिबाग**

## सुवर्णकण



प्रत्येक वस्तूमध्ये आणि व्यक्तीमध्ये जो गुण दिसला त्यासाठी श्री दत्तात्रय यांनी प्रत्येकास गुरु मानले.
**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

## बाटा शोरूमला आग

**मुंबई :** चेंबूर येथील मल्हार हॉटेलनजीकच्या शीव आशिष इमारतीतील २ हजार चौरस फूट जागेतील बाटाच्या दुकानाला सोमवारी (दि. ११) पहाटे साडेचारच्या सुमारास भीषण आग लागली. दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य हाती घेतले. तसेच, अदानी इलेक्ट्रिसिटी व संबंधित पालिका विभाग कार्यालयातील कर्मचारी, पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. सुदैवाने दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, आगीमुळे शोरुममधील विद्युत यंत्रणा, विजेच्या तारा, चप्पल बुट, बॉक्स, कागदपत्रे आदी वस्तू जळून खाक झाल्या. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## एसटी बसचा अपघात

**कल्याण:** कल्याणवरून माळशेजमार्गे पुणे शिवाजीनगरकडे जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसला सोमवारी सकाळी मोठा अपघात झाला. कल्याणपासून काही अंतरावर बसचे चाक अचानक निखळले. अपघातावेळी बसमध्ये ४० पेक्षा अधिक प्रवासी होते. या दुर्घटनेत ३ ते ४ प्रवाशांच्या डोक्याला मार लागून ते जखमी झाले आहेत. सुदैवाने बस माळशेज घाटापूर्वीच थांबल्याने मोठा अनर्थ टळला. जर, हा प्रकार घाटामध्ये झाला असता, तर गंभीर जीवितहानी होण्याची शक्यता होती. असे प्रत्यक्षदर्शी प्रवाशांनी सांगितले. दरम्यान, बसमधील जखमी प्रवाशांना किरकोळ मार लागल्याने प्रवासी दुसऱ्या एसटी बसमध्ये बसून पुढे रवाना झाले.

## ६ व्या थरावरून कोसळून मुलाचा मृत्यू

**मुंबई :** दहीहंडीचा सराव सुरू असताना ६ व्या थरावरून कोसळून ११ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. दहिसरच्या केतकीपाडा येथे रविवारी रात्री नेहमीप्रमाणे नवतरूण मित्रमंडळाचे पथक गोविंदाचा सराव करत होते. या पथकात महेश रमेश जाधव (११) या चिमुकल्या गोविंदाचा समावेश होता. या पथकाने ६ थर लावले होते. चिमुकला महेश ६ व्या थरावर चढला होता. रात्री पावणे दहाच्या सुमारास तो ६ व्या थरावरून कोसळला आणि त्याला झेलण्याच्या आत तो जमिनीवर पडला. त्याला उपचारासाठी दहिसर पूर्वेच्या प्रगती रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे मोठी शोककळा पसरली आहे.

# निवृत्त शिक्षिकेच्या खुनाचा उलगडा

## ● पैसे, दागिन्यांच्या हव्यासातून हत्या; लहानशा तिकिटाने सोडवला धागा

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**
चिपळूण तालुक्यामधील धामणवणे येथील ६८ वर्षीय निवृत्त शिक्षिका वर्षा वासुदेव जोशी यांच्या हत्या प्रकरणाचा छडा लावण्यात पोलिसांना अवघ्या दोन दिवसात यश आले आहे. ४६ वर्षीय जयेश भालचंद्र गोंधळेकर याच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या आहेत. पैसे आणि दागिन्यांच्या चोरीसाठी त्याने वृद्धेची हत्या केल्याचा आरोप आहे. न्यायालयाने जयेशला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तर जयेशचा साथीदार असलेला संशयित आरोपी गणेश कांबळे पसार असून त्याच्या शोधासाठी चिपळूण पोलीस पथक रवाना झाली आहेत.

जयेश गोंधळेकर यापूर्वी सातारा येथे काम करत होता. तिथे त्याची गणेश कांबळे याच्याशी ओळख झाली. दोघंही चांगले मित्र असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. या दोघांनी मिळूनच वर्षा जोशी यांची अत्यंत निर्दयीपणे



हत्या केली.

आरोपी जयेश हा चिपळूण तालुक्यातील गोंधळे गावातीलच रहिवासी आहे. पैसे आणि दागिन्यांसाठीच त्याने खून केल्याची माहिती तपासात समोर आली आहे. या गुन्ह्यात मित्र गणेशही सहभागी असल्याचे खुद्द जयेशने पोलिसांना सांगितले. जयेशला कॉम्प्युटरमधील चांगले ज्ञान असल्याने त्याने हत्येनंतर सीसीटीव्ही फुटेज डीव्हीडीआर, कॉम्प्युटरमधील हार्ड डिस्क गायब केली होती. इतकेच नाही, तर जोशींचा मोबाईलही गायब करुन एका पाण्याच्या टाकीत टाकला होता. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील आरवलीच्या पुलावरुन या वस्तू त्याने फेकल्या होत्या. मात्र, त्या शोधून काढण्यात पोलिसांना यश आले आहे. जयेश आणि गणेशने खून केल्यानंतर पद्धतशीरपणे पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांनी जोशींच्या घरात मिळालेलं प्रवासाचे जुने तिकीट आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेज यावरुन अवघ्या दोन दिवसात जयेशच्या मुसक्या आवळण्यात यश मिळवले.

जयेश ट्रॅव्हल एजंट असून त्याच्या माध्यमातून जोशींनी अनेकदा आसाम, पुणे अशा विविध ठिकाणी प्रवास केला होता. त्या हैदराबाद सहलीसाठीही जाणार होत्या. जयेशने त्यांचा विश्वास संपादन केला होता. त्यांच्याकडे खूप पैसे व दागिने असतील या विचाराने जयेशने एका साथीदाराच्या मदतीने मोठा प्लॅन करुन निर्दयीपणे खून केला. तोंडात कपड्याचे बोळे घालून, तोंड आणि मान दाबून त्याने जोशींचा खून केला. त्यांचे हात पायही यावेळी बांधण्यात आले होते. घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्येही तो जोशी यांच्या घराच्या दिशेनेच येत असल्याचे दिसले. जोशींच्या घरात एक जुने प्रवास तिकीट मिळाले होते त्यावर जयेशचे नाव पोलिसांना आढळले. या माहितीवरून पोलिसांना आरोपीपर्यंत पोहोचणे शक्य झाले. या प्रकरणाचा अधिक तपास चिपळूण पोलीस करीत आहेत.

## गावठी हातभट्टीची दारू जप्त

**। रत्नागिरी । प्रतिनिधी।**
लांजा-वैभव वसाहत येथे पोलिसांनी केलेल्या कारवाईत विदेशी व गावठी हातभट्टीची दारू जप्त केली आहे. याप्रकरणी संशयिताविरुद्ध लांजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजन गजानन कांबळे (वय ४६, रा. बौद्धवाडी, लांजा) असे संशयिताचे नाव आहे. ही घटना शनिवारी (दि. ०९) रात्री आठच्या सुमारास लांजा वैभव वसाहत येथील फणसाच्या झाडाखाली एका पडक्या शेडमध्ये निदर्शनास आली. या कारवाईत ५ हजार ४४५ रुपयांची हातभट्टीची व विदेशी दारू जप्त केली. या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल सुयोग वाडकर यांनी लांजा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास लांजा पोलीस अंमलदार करत आहेत.

## कबुतरखान्यासाठी जैन धर्मीय आक्रमक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
मुंबई महापालिकेने दादर पश्चिम येथील कबूतरखाना पुन्हा एकदा ताडपत्रीने झाकला आहे. यापूर्वी ६ ऑगस्ट रोजी जैन धर्मियांनी आंदोलन करत ताडपत्री हटवण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी न्यायालयानेही ताशेरे ओढले आहेत. कबूतरखाना बंदच ठेवण्यात येणार असून, पुढील सुनावणी १३ ऑगस्ट रोजी होणार आहे.

रविवारी रात्री महापालिकेने पोलिसांच्या मदतीने कबूतरखाना झाकला आणि परिसरात बॅरिकेडिंग केली. तसेच मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मराठी एकीकरण समितीने बुधवारी दादर कबूतरखाना



### सामूहिक आंदोलन करण्याचा इशारा

येथे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. कायदा मोडणाऱ्यांवर कारवाईची मागणी समितीने केली आहे. मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी कायदा सुव्यवस्था बिघडवल्यास लाखोंनी मोर्चे काढण्याचा इशारा दिला आहे. जैन मुनी नीलेशचंद्र विजय यांनी जरूरत पडली आम्हाला तर आम्ही शस्त्र पण उचलू, असे वक्तव्य केले आहे. त्यांनी सरकारला आव्हान देत, अपेक्षा पूर्ण न झाल्यास कबूतरखान्यातच सामूहिक आंदोलन करण्याचा इशारा दिला. यावर शिंदेंच्या शिवसेनेच्या नेत्या मनीषा कांडे यांनी देशात न्यायव्यवस्था असल्याचे सांगत, ज्यांना कबूतर आवडतात त्यांनी ती घरी पाळावीत, असे प्रत्युत्तर दिले.

## आदिवासी दिनानिमित्त रानभाज्या प्रदर्शन

● पाककृती स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद
● सहभागी स्पर्धकांचा प्रमाणपत्र देवून गौरव

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**
मिरजोळी पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित दलवाई हायस्कूल मिरजोळी प्राथमिक विभागामध्ये आदिवासी दिनाचे औचित्य साधून नुकतेच रानभाज्या प्रदर्शन व पाककृतीस्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या निमित्त आयोजित स्पर्धेत, सध्या लोप पावत चाललेलया रानभाज्या आणि त्यापासून बनवलेल्या विविध पदार्थांचा मेळाच भरला होता. यामुळे अनेकांना विविध भाज्यांची चव चाखता आली.

या स्पर्धेला पालकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. या स्पर्धेमध्ये इयत्ता इ.१ली ते ४थी च्या १२ पालकांनी सहभाग नोंदविला.



पालकांनी आपल्या कल्पनेतून विविध रानभाज्यांपासून कटलेट, पकोडे, थालिपीठ, भाजी भाकरी, भाजी, वडी यांसारखे रुचकर पदार्थ बनविले होते. कार्यक्रमाची सुरुवात माध्यमिक विभागातील इ.१०वी च्या विद्यार्थ्यांनी आदिवासी नृत्यप्रकाराने केली. यादिवशी क्रांतिदिन असल्याने इयत्ता दुसरी ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. आपले मनोगत व्यक्त करताना स्कुल कमिटी चेअरमन खालीद दलवाई यांनी रानभाज्या या आपल्या आरोग्यासाठी खजिनाच आहेत व त्यांचा आस्वाद घेतलाच पाहिजे, असे म्हटले. स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून डांगे आणि बोराटे लाभल्या होत्या. या स्पर्धेत चव, पौष्टिकता, सादरीकरण आणि वेगळेपण या मुददयांच्या आधारे परिक्षण करुन प्रथम ३ क्रमांक काढण्यात आले. प्रथम क्रमांक-ऋतुजा रुपेश सागवेकर (पदार्थ-कुर्डुचे थालिपीठ) व्दितीय क्रमांक-काव्या किरण आंब्रे (पदार्थ-भारंगीची भाजी आणि भाकरी) तृतीय क्रमांक-रिया राजेंद्र बने (पदार्थ-कंटोलीचे हरभरा कबाब) पाहुण्यांच्या हस्ते प्रथम तीन क्रमांकांना प्रमाणपत्र व बक्षीस आणि इतर सहभागी स्पर्धकांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात आले.

## कुंडेश्वर दर्शनाला जाणाऱ्या पिकअपचा अपघात

### चार महिला भाविकांचा मृत्यू

**। पुणे । प्रतिनिधी ।**
पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील कुंडेश्वर दर्शनाला जाणाऱ्या महिला भाविकांच्या पिकअपचा भीषण अपघात झाला. या दुर्दैवी घटनेत चार महिलांचा मृत्यू झाला असून २२ महिला भाविक जखमी झाल्या आहेत. हा अपघात दुपारी सव्वा एक वाजताच्या सुमारास घडला.

श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारनिमित्ताने पुण्याच्या खेड तालुक्यातील श्री क्षेत्र कुंडेश्वर येथे महिला पिकअपमधून दर्शनासाठी जात होत्या. नागमोडी वळणावर घाट चढताना गाडी रिटर्न आल्याने महिला भाविकांची पिकअप जीप पलटली नागमोडी वळणावर घाट चढताना महिला भाविकांची पिकअप जीप पलटली आणि दरीत कोसळली. पिकअपने ५ ते ६ पलटी खाल्ल्याने त्यातील चार महिलांचा मृत्यू झाला असून २२ महिला भाविक गंभीर जखमी झाल्या आहेत.

## झाडांना राख्या बांधून पर्यावरण रक्षणाचा संदेश

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**
सह्याद्रि शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल व ज्यु.कॉलेज, आंबडस विद्यालयात नारळीपौर्णिमा आणि रक्षाबांधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून वृक्ष हे खऱ्या अर्थाने आपले संरक्षण करतात. निसर्गाचा समतोल राखण्यात झाडे महत्वाची भूमिका बजावतात. अलीकडच्या काळात वाढत चाललेली वृक्षतोड आणि त्यामुळे होणारा निसर्गाचा ऱ्हास हे मुद्दे डोळ्यांसमोर ठेवत वृक्ष लागवड आणि संवर्धन याबाबत विद्यार्थी व समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या हेतूने विद्यालयातील



### ● आंबडस विद्यालयात वृक्ष रक्षाबंधन

हरित सेना व विज्ञान छंद मंडळ या उपक्रमांतर्गत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी झाडांना राखी बांधून झाडे लावा झाडे जगवा, असा संदेश दिला.

यासाठी विद्यालयातील इयत्ता ११वी सायन्सचे विद्यार्थी व वर्गशिक्षिका प्रज्ञा जठार यांनी विशेष मेहनत घेतली. या कार्यक्रमाला विद्यालयातील शिक्षक महेश कुलकर्णी, राजेंद्र बांबाडे, मधुसूदन मार्गज, गणेश सावर्डेकर, कृष्णकांत कुंभार, भास्कर महाडिक व रुपेश धाडवे, संतोष शिंदे, सिद्धेश पाटील तसेच शिक्षिका राजनीगंधा पवार, संगीता चौघुले, प्रज्ञा जठार, उषा आवळे, साक्षी दळवी तसेच शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## भीषण अपघातात पत्नीचा मृत्यू

### पतीने मृतदेह नेला दुचाकीवर बांधून

**। नागपूर । प्रतिनिधी ।**
नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्गावर माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. महामार्गावर भीषण अपघात झाल्यानंतर रस्त्यावर मदतीसाठी कुणीही थांबले नाही. शेवटी हतबल पतीने मृतदेह दुचाकीवर बांधून नेला. महामार्ग पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन मेयो रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठवला.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर-जबलपूर महामार्गावर मोरफाटा परिसरात ट्रकने दुचाकीला धडक दिली. या धडकेत ग्यारसी अमित यादव या महिलेचा मृत्यू झाला. यावेळी महामार्गावर मदतीसाठी कुणीही थांबले नाही. हतबल झालेला पती अमित भुरा यादव याने मृतदेह दुचाकीवर बांधून नेण्याचा निर्णय घेतला.

नागपूरमध्ये राहणारा अमित आणि ग्यारसी हे रक्षाबंधनसाठी लोणारा इथून करणपूरला निघाले होते. त्यावेळी मागून आलेल्या ट्रकने कट मारल्याने ग्यारसी खाली पडली आणि ट्रकच्या चाकाखाली गेली. यात तिचा जागीच मृत्यू झाला. अमितने हात जोडून मदतीसाठी अक्षरश: भीक मागितली. मात्र कोणीही मदतीसाठी थांबले नाही. रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडलेला पत्नीचा मृतदेह न्यायचा कसा? असा प्रश्न पडलेल्या अमितने शेवटी दुचाकीला मृतदेह बांधला आणि मध्य प्रदेशातील सिवनीच्या दिशेने निघाला. दरम्यान, अमित गाडीवरून मृतदेह घेऊन जात असताना महामार्ग पोलिसांनी त्याला अडवला आणि त्याची चौकशी केली. त्यानंतर ग्यारसीचा मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी नागपूरच्या मेयो रुग्णालयात पाठवला.



## यवतमाळ जिल्ह्यात गतिमंद तरुणीवर सामूहिक अत्याचार

**। यवतमाळ । प्रतिनिधी ।**
यवतमाळ जिल्ह्यातून एक अतिशय संतापजनक बातमी समोर आली आहे. एका गतिमंद तरुणीच्या असह्यतेचा फायदा घेऊन पाच जणांनी तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला आहे. ही गंभीर घटना दारव्हा तालुक्यातील एका गावात उघडकीस आली. घटनेची तक्रार दाखल होताच पोलिसांनी तीन जणांना तात्काळ अटक केली. तर घटनेतील एक आरोपी अल्पवयीन असून पाचव्या आरोपीचा शोध सध्या सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,



पीडित तरुणी घरी परत येत असताना रात्रीच्या सुमारास आरोपींनी तीला ले-आऊटमध्ये नेले आणि तिच्यावर बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. या घटनेची पुसटशी कल्पना देखील पीडितेच्या कुटुंबीयांना नव्हती. अशातच तक्रारदारांचा मुलगा आणि आरोपी यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. या वादात आरोपीने पीडितेच्या मावशीसोबत मजा केल्याचे उद्गार काढले. त्यानंतर ही संतापजनक घटना उघडकीस आल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी दिली.

घटनेनंतर गतिमंद तरुणीच्या बहिणीने दारव्हा पोलिसात याप्रकरणी तक्रार दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक केली आहे, मात्र या घटनेने सर्वत्र एकाच खळबळ उडाली असून स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड रोष बघायला मिळत आहे. सध्या या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहे.

## विहिरीत बुडून मुलाचा मृत्यू

**पालघर :** वसई पूर्वेच्या धुमाळनगर येथे विहिरीत बुडून १७ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली आहे. रविवारी (दि.१०) दुपारी बाराच्या सुमारास ही घटना घडली. समशूल खान असे मृत मुलाचे नाव आहे. वसई पूर्वेच्या भागात धुमाळनगर परिसरात असलेल्या विहिरीत रविवारी दुपारच्या सुमारास मुलांचा गट पोहण्यासाठी आला होता. पाण्यात पोहत असताना समशूल हा पाण्यात बुडाला. याची माहिती पालिकेच्या अग्निशमन दलाला दिली होती. त्यांनी शोध कार्य करून समशूलला बाहेर काढण्यात आले. तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता.

### 'सायन्स ऑन व्हील्स' बसचे लोकार्पण | ग्रामीण मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे कार्य

# विद्यार्थ्यांना मिळणार आधुनिक विज्ञानाचे धडे

**। नाशिक । प्रतिनिधी ।**
**अंतराळ विश्वातील वैज्ञानिक घडामोडी, चांद्रयान मोहीम, गगनयान, अचूक नेव्हिगेशन प्रणाली दर्शविणारे आधुनिक तंत्रज्ञान यासह विज्ञानातील तब्बल २०० प्रयोगांमधून सायन्स ऑन व्हील्स ही अनोखी बस साकारण्यात आली आहे. 'चाकं शिक्षणाची' आणि 'एआय ऑन व्हील्स' या दोन्ही प्रकल्पांच्या यशस्वी प्रयोगानंतर नाशिक येथील इस्पॅलिअर स्कूलच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेली ही बस जणू फिरती वैज्ञानिक प्रयोगशाळा आहे. आदिवासी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सायन्स ऑन व्हील्स या बसच्या माध्यमातून आधुनिक विज्ञानाचे धडे मिळणार आहेत.**




इस्पॅलिअर स्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही इनोव्हेशन डे उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी 'सायन्स ऑन व्हील्स' या अनोख्या बसचे लोकार्पण करण्यात आले. ही बस पूर्वी 'एज्युकेशन ऑन व्हील्स' म्हणून वापरली जात होती. बसमध्ये गणित, इंग्रजी, विज्ञान हे विषय शिकवले जात असल्याने आणि तिच्या अनोख्या डिझाइनमुळे गरीब वस्त्यांमधील विद्यार्थ्यांचा ती विश्वास जिंकू शकली. आणि १९ हजारपेक्षा जास्त शाळा सोडलेल्या मुलांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य यशस्वीपणे केले.

आदिवासी तसेच ग्रामीण भागात अंधश्रद्धा अधिक असतात. ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना विज्ञानाची माहिती नसल्याने अंधश्रद्धेला खतपाणी मिळत जाते. त्यातून अनेक अघोरी प्रथाही सुरू होतात. अंधश्रद्धेला दूर करून या विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने शिक्षण अभ्यासक सचिन जोशी यांच्या संकल्पनेनुसार आणि विद्यार्थ्यांच्या मदतीने वेगवेगळे २०० वैज्ञानिक प्रयोग साकारण्यात आल्यावर सायन्स ऑन व्हील्स ही फिरती प्रयोगशाळा तयारी झाली.

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या दारात विज्ञानाचे प्रकल्प

आदिवासी शाळांकडे वैज्ञानिक प्रयोगशाळांची सुविधा नसल्यामुळे ही बस विद्यार्थ्यांच्या दारापर्यंत विज्ञानाचे प्रकल्प, प्रयोग आणि अनुभवात्मक शिक्षण घेऊन जाणार आहे. मुख्य म्हणजे या बसमध्ये २०० पेक्षा अधिक शास्त्र विषयाचे प्रारुप आहेत. जे शाळेच्या विद्यार्थ्यांनी तयार केले असून सामाजिक भावनेतून हे सर्व प्रारुप त्यांनी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी भेट दिले आहेत. बसच्या बाहेरील सजावट आदिवासी वारली चित्रकलेच्या माध्यमातून करण्यात आली असून, त्यातून वैज्ञानिक प्रकल्प दर्शविण्यात आले आहेत.

> **"अनेक वर्षांपासून अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करत आहोत. आदिवासी भागांमधील अंधश्रद्धा दूर व्हाव्यात आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये जागृत व्हावा, यासाठी 'सायन्स ऑन व्हील्स' च्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचे उद्दिष्ट आहे. प्रत्यक्ष वैज्ञानिक प्रयोग केल्याने, त्यातून आलेल्या अनुभवाने विद्यार्थ्यांना शिकायला मिळते. यामुळे त्यांची जिज्ञासा वाढते, त्यांची निरीक्षण क्षमता सुधारून समस्या सोडवण्याची क्षमता विकसित होते. या फिरत्या वैज्ञानिक प्रयोगशाळेचा फायदा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नक्की होईल."**
> **– सचिन जोशी, शिक्षण अभ्यासक, नाशिक**

# न्हावा बंदरात माझगाव डॉक

**• देशातील सर्वात मोठा तरंगता ड्राय डॉक; एमसीझेडएमएने दिला हिरवा कंदील**

| उरण | प्रतिनिधी |

भारतातील युद्धनौका निर्माती कंपनी माझगाव डॉक शिपबिल्डर्स न्हावा बंदरात देशातील सर्वा मोठा तरंगता ड्राय डॉक उभारणार आहे. एमसीझेडएमएने यासाठी त्यांना हिरवा कंदील दिला आहे. सरकारी मालकीच्या जहाजबांधणी कंपनीचा हा तरंगता ड्राय प्रकल्प तब्बल पाच हजार कोटी रुपयांच्या विस्तार योजनेचा एक महत्वाचा भाग आहे.

महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटीच्या जुलै महिन्यात झालेल्या अधिवेशनात न्हावा येथे नवीन सुविधा विकसित करण्याच्या माझगाव डॉकच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. १८० मीटर लांबीचा आणि १३,५८५ चौरस मीटर क्षेत्रफळ असलेले हे न्हावा तरंगते ड्राय डॉक जहाज बांधणीच्या कामासाठी आवश्यक असलेल्या जमिनीवर आधारित पायाभूत सुविधांचा अभाव कमी करणार आहे. एमसीझेडएमएच्या बैठकीतील निर्णयानुसार



माझगाव डॉक त्यांच्या न्हावा यार्डच्या उत्तरेकडील परिमितीवर तात्पुरती असेंबली सुविधा स्थापित करणार आहे. तरंगत्या ड्राय डॉकमध्ये एकूण आकाराची तरंगती रचना असून, जी देखभाल आणि दुरुस्तीसाठी जहाजे समुद्रातून बाहेर काढण्यासाठी डिझाईन केलेली असते. जहाजाच्या आत प्रवेश करण्यासाठी ते अशंत: पाण्यात बुडवले जाऊ शकते. आणि जहाज उंच आणि कोरडे ठेवण्यासाठी ते वर केले जाऊ शकते. ज्यामध्ये दोन ओल्या खोऱ्यांसह एक ड्राय डॉक, कार्यशाळा, साठवण क्षेत्रे आणि जहाज दुरुस्ती केंद्रासह सहाय्यक इमारतींचा समावेश आहे.

सुमारे ४०.३७ एकर क्षेत्र व्यापले जाणार आहे. युद्धनौका आणि व्यावसायिक जहाजांच्या बांधकाम आणि नूतनीकरणाला पाठिंबा देण्यासाठी हा प्रकल्प आहे. बैठकीत मांडण्यात आलेल्या पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन अहवालात असे म्हटले आहे की, सुविधा सुरू करण्यासाठी लाटांच्या क्रियेपासून संरक्षण आवश्यक असले तरी न्हावा येथील जागेला अनुकूल परिस्थितीचा फायदा होईल. विशेष म्हणजे न्हावा ही येथील नवीन जहाज दुरुस्ती व बांधणी यंत्रणा स्थानिकांच्या विकासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. एमडीएल ही कंपनी सध्या ६ हजारहून अधिक कुशल कामगारांना थेट आणि अनेकांना अप्रत्यक्षरीत्या रोजगार देत आहे. प्रकल्प सुरू झाल्यास रायगडच्या विकासाला मोठा हातभार लागणार आहे.

हॉटेल्स कामगारांसाठी निवास ट्रान्सपोर्ट बांधकाम साहित्य छोटी दुकाने अशा विविध सेवा आणि व्यवसायांना या क्षेत्रात मागणी वाढणार आहे. भविष्यात सरकारकडून या परिसराच्या विकासाकडे अधिक लक्ष दिले जाऊ शकते. जवळ किंवा इतर संस्थांमार्फत स्थानिक तरुणांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जात असून, हे प्रशिक्षण भविष्यातील रोजगारासाठी उपयुक्त ठरू शकते. यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर हा प्रकल्प स्थानिक नागरिकांसाठी दीर्घकाळ एक स्थिर उत्पन्नाचे स्तोत्र ठरणार आहे दरम्यान हा प्रकल्प सुरू झाल्यास त्याचा रायगडच्या विकासाला मोठा हातभार लागणार आहे.

### युवकांना नोकरीची संधी

प्रकल्पाच्या उभारणीसाठी आणि नंतर देखभाल व संचालनासाठी कुशल, अर्ध कुशल व अकुशल कामगारांची गरज भासणार आहे. त्यामुळे येथील युवकांना बांधकाम, वेल्डिंग, इलेक्ट्रिकल, मशिनिंग, सुरक्षा सेवा स्वच्छता वाहतूक इत्यादी क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध होतील.

## लायन्स क्लब पोयनाडतर्फे आदिवासी दिन साजरा




| अलिबाग | प्रतिनिधी |

लायन्स क्लब पोयनाड यांच्या वतीने शनिवार (दि.९) ऑगस्ट रोजी नवेनगर आदिवासीवाडी, पोयनाड येथे आदिवासी दिन आणि रक्षाबंधन साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत लहान मुलांना राख्या बांधण्यात आल्या तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रदीप सिनकर, पोयनाड लायन्स क्लबचे अध्यक्ष गुरुनाथ माळी, प्रगती सिनकर, विनोद पाटील, महेंद्र पाटील, मनोहर चवरकर, श्रीपाद तेंडुलकर, सूर्यकांत पाटील, सरोज डाकी, प्रमोद राऊत, आणि भाग्यश्री सिनकर यांच्यासह सर्व सभासदांनी विशेष सहकार्य केले. या सामाजिक उपक्रमामुळे आदिवासी वाडीतील लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला होता.

## अजगराला जीवदान

**बोर्ली पचतन :** म्हसळा तालुक्यातील गोंडघर येथील स्वप्निल बिराडी यांच्या गुरांच्या गोठ्यामध्ये अजगर असल्याची माहिती वडवली येथील निशांत बिराडी, निसर्ग बिराडी आणि शिवराज चालके या सर्पमित्रांना कळताच त्यांनी ताबडतोब त्या ठिकाणी जाऊन अनिकेत कांबळे यांच्या सहकार्याने अजगर जातीच्या सापाला कोणतीही इजा न करता मोठ्या शिताफीने पकडून त्याला नैसर्गिक अधिवासात सुखरुपपणे सोडले. सध्या मोठ्या प्रमाणात होत असलेली जंगलतोड त्यामुळे या जिवांचा नैसर्गिक अधिवास कमी होत असल्याने ते भक्षाच्या शोधात मानवी वस्तीत येतात असे स्वप्नील बिराडी यांनी सांगितले.



●अलिबाग तालुक्यातील किहीम समुद्र किनारी श्रावण महिन्यातील सोमवारीच प्रकट होणाऱ्या श्री महादेवाच्या पिंडीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी दिसत आहे. (छायचित्र: समीर मालोदे)

## इतिहासकाळाचे साक्षीदार श्री मल्लेश्वर मंदिर

| रेवदंडा | प्रतिनिधी |

चौलचे प्राचिनत्व इ. स. पुर्व १२०० पर्यंत नेता येते. प्राचीन इतिहास असलेल्या या नगरीत पुरातनकाळात चौल चंपावती नगरी या नावाने संबोधले जात होते. प्राचीन काळात चौल व रेवदंडा या दोन्ही वैभवशाली शहरांना अन्यसाधारण महत्व असून, येथून समुद्रमार्गे देशीविदेशी व्यापार होत असे, दोन्ही ठिकाणे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे केंद्र व प्रसिध्द बंदरे होती.

शिवकाळात रेवदंडा पोर्तुगिजाचे वर्चस्वाखाली होते, येथे पोर्तुगिजानी आगरकोट किल्ला बांधला. पोर्तुगिजाच्या अंमलाखाली



असलेल्या रेवदंडा विभागाला लोअर चौल तसेच चौलमध्ये सन १६८३ मध्ये संभाजी महाराजानी राजकोट किल्ला बांधला असा लिखीत उल्लेख सापडतो. मात्र राजकोट किल्ला व चौलवर नेहमीच मुघलाचे वर्चस्व राहून या भागाला नेहमी अप्पर चौल संबोधले जात. प्राचीन चौल चंपावतीनगरीचे शिवकाळात अप्पर चौल व लोअर चौल असे दोन भाग पडले गेले.

चौल चंपावती देवी मंदिरानजीकच इतिहासकाळाचे साक्षीदार असलेले चौलचे भाविकांचे श्रध्दा व भक्तीचे स्थान प्रसिध्द जागृत श्री मल्लेश्वर मंदिर आजही पहाण्यास मिळते.

चौलचौकी ते रेवदंडा बायपास या रस्त्याला मोडकआळी नजीक श्री मल्लेश्वर मंदिर आहे, इतिहासकाळाचे साक्षीदार असलेले हे श्री शंकराचे मंदिर एक जागृत देवस्थान म्हणून पुर्वीपासून प्रसिध्दीस आहे. नारळ पोफळीच्या गर्द छायेत हे श्री शंकराचे मंदिर मुख्यः रस्त्यालगत असल्याने नजरेत भरते, जुन्याकाळातील चौपाखी कौलारू व साधे बांधकामाचे श्री मल्लेश्वराचे मंदिर दुरूनच विलोभनिय वाटते, या मंदिराकडे पहाताच शांत, समाधानाची एक आगळीकता दृष्टीक्षेपात मिळते. हे मंदिर प्राचीन आहे, मात्र शिवकाळात अंतिम पर्वात सन १७५८ च्या फेब्रुवारी महिन्यात या मंदिराचे बांधकाम अलिबागचे त्रिंबक महादेव डबीर यांनी केले असा उल्लेख आढळतो. या परिसरात श्री त्रिविक्रम नारायण मंदिराजवळ, आंबपुरी पाखाडीत मामलेदार बालाजी व दादाजी देशपांडे यांची हवेली असल्याचे लिखित आढळते. तर इ. स. १९७० मध्ये श्री मल्लेश्वर मंदिराजवळ चुन्याची भट्टी सुरू झाल्याचा उल्लेख आहे.

## पनवेल पालिकेतर्फे सायकल रॅली



| पनवेल | प्रतिनिधी |

घरो घरी तिरंगा अर्थात हर घर तिरंगा या मोहिमेअंतर्गत आयुक्त प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेमार्फत विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत रविवार (दि. १०) ऑगस्ट रोजी तिरंगा सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. सहा वाजता या तिरंगा सायकल रॅलीची सुरुवात झाली. या सायकल रॅलीला विविध सायकल क्लबचे तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

देशभक्तीने भारावलेले सुमारे ३०० हून अधिक सायकलस्वार या रॅलीत सहभागी झाले होते. या सर्वांनी तिरंगा अर्थात राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी तिरंगा हाती घेऊन वडाळे तलाव येथून सकाळी सहा वाजता या तिरंगा सायकल रॅलीची सुरुवात झाली.

रॅली सावरकर चौक-वि. के हायस्कूल नवीन पनवेल सिग्नल ब्रिज, एचडीएफसी बँक, डी मार्ट, एमटीएनएल ऑफिसपुढे, अदई तलाव, झुडिओ, तेरणा सर्कल (आदई सर्कल ), आय्यपा मंदिर, सीकेटी स्कूल समोरून पिल्लाई इंजिनीरिंग कॉलेज, विसपुते हॉस्टेल, रेल्वे स्टेशनं, अभ्यदय बँक, सिग्नल ब्रिज या मार्गाने पुन्हा वडाळे तलाव येथे रॅलीचा शेवट झाला.

पनवेल सायकलिंग क्लब, रणथॉन सायकलिंग क्लब, केकेसीसी क्लब पेडल वॉरियर्स, इंडियन नेव्ही, वॉन्डरर्स ग्रुप, डीसीसी बेलापूर ग्रुप, स्पिन रोड वॉरियर्स, पनवेल रायडर्स, निसर्गमित्र पनवेल, तिरंगा सायकलिंग, सीबीएसईएफ सायकलिंग असोसिएशन, रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर या सायकल क्लबच्या सहकार्याने ही तिरंगा रॅली काढण्यात आली. विविध सायकल क्लब तसेच नागरिकांनीही या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. यावेळी उपस्थितांनी तिरंगा प्रतिज्ञा घेतली. दरम्यान, या रॅलीचे ठिक-ठिकाणी स्वागत करण्यात आले, तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## वैकुंठ दादा पाटील मित्र मंडळातर्फे मानाच्या तीन हंड्या

| पेण | प्रतिनिधी |

आगामी येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या निवडणूकींचा विचार करता सर्वच राजकीय मंडळी दहीहांडी उत्सवात सामील झालेले पहायला मिळतात. गेली तीन वर्ष वैकुंठ दादा पाटील मित्र मंडळ सातत्याने हमरापुर विभागात दहीहांडी उत्सवाचा कार्यक्रम घेऊन ग्रामीण भागातील दहीहांडी पथकांना सहभागी होण्याची संधी देत आहेत. गेल्या वर्षी त्यांनी वाशी नाका येथे दहीहांडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. गेल्यावर्षी मिळालेल्या प्रतिसादाचा विचार करून हमरापुर (तांबडशेत), वाशीनाका, वडखळ आणि नागोठणे यामधील हमरापुर येथे दहीहांडी उत्सवाचे आयोजन केले आहे. वाशीनाका वडखळ येथे १ लाख ११ हजार १११ रूपयांचे बक्षिस असणार आहे. तर वडखळ येथील दहीहांडीसाठी जास्ती-जास्त मानधनाची हांडी असणार आहे. सलामीसाठी १० हजार रूपये आणि स्थानिक गोविंदा पथकांसाठी तीन थराची सलामी देणाऱ्यांना ५ हजार रूपये जाहीर केले आहे, मंडळाचे अध्यक्ष वैकुंठ पाटील, मिलींद पाटील यांनी दिले. यावेळी सोपान जांभेकर, आनंद लाड, श्रीकांत पाटील, रविकांत म्हात्रे, गोरख म्हात्रे, हिरामण भोईर, दत्तात्रेय पाटील, नंदकुमार पाटील, चंद्रकांत पाटील, काशिनाथ पाटील, परमेश पाटील, महेश म्हात्रे, शेखर म्हात्रे, विजय गायकवाड, सदाशिव म्हात्रे, आदी उपस्थित होते.

## 'ग्रामीण नाट्य चळवळ कायम ठेवा'

**चिरनेर :** अष्टगंध कला मंचाच्या प्रत्येक स्त्री-पुरुष कलाकाराला नाट्य वेडाने अक्षरशः पछाडलेले असून, अष्टगंध कला मंचाच्या प्रत्येक कलाकारासाठी तीर्थक्षेत्र असणाऱ्या या रंगभूमीची सेवा करण्यासाठी, नाट्य चळवळ कायम ठेवू, असे प्रतिपादन अष्टगंध कला मंचाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे यांनी केले. अष्टगंध कला मंचाच्या वतीने पाली-परळी येथे कलाकारांसाठी दोन दिवसांच्या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी अशोक म्हात्रे हे कलाकारांना संबोधित करताना बोलत होते.

**श्रावणातील प्रत्येक मंगळवारी केली जाते पूजा** | **जागरणात पारंपारिक खेळांचा समावेश**

# नवविवाहित महिलांची मंगळागौर

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रावण मासातील मंगळागौर पूजन हे हिंदू धर्मातील एक व्रत वैकल्य समजले जाते. नवविवाहित स्त्रीया लग्न झाल्यानंतर पहिल्या पाच वर्षे मंगळागौरीचे व्रत करतात. तसेच, मंगळागौरीची पूजा श्रावण मासातील प्रत्येक मंगळवारी केली जाते. मंगळागौर हे आईने मुलीला लग्नानंतर दिलेले सौभाग्य व्रत असल्याचेही मानले जाते. नवविवाहितेला अखंड सौभाग्य व तिच्या सासर माहेरास सुखसमृद्धी लाभावी म्हणून हे व्रत केले जाते. या दिवशी पार्वती देवीची पूजा करुन जागरण केले जाते. जागरणात पारंपारिक खेळ खेळले जातात.

पूजेसाठी वेगवेगळ्या झाडांची पाने व फुले वाहिले जातात. यामध्ये अर्जुन सादडा, आघाडा, कण्हेर, चमेली, जाई, डाळिंब, डोरली,



तुळस, दूर्वा, धोत्रा, बेल, बोर, माका, मोगरा, रुई, विष्णुक्रांता, शमी, शेवंती, केवडा ही सर्व सोळा पत्री वाहिली जातात. सर्व काही मंगल होवो घरात सुख संपन्नता नांदो, गौरी गौरी सौभाग्य दे अशी प्रार्थना करून सर्व काही मंगलदायी होवो यासाठी ही पूजा केली जाते. या दिवशी नवविवाहितांना बोलावून एकत्रित पूजा केली जाते.

श्रावण महिन्यातील प्रत्येक मंगळवारी मंगळागौर साजरी केली जाते. मंगळगौरीचे व्रत म्हणजे नवविवाहितेसाठी उत्साहाची, आनंदाची पर्वणी असते. आपली धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा जपणारे हे व्रत स्त्रियांना रोजच्या जीवनापेक्षा काहीतरी वेगळं करण्याची संधी देते. पूर्वीच्या काळी स्त्रियांचे जीवन चुल मूल इथपर्यंतच मर्यादीत होते. त्यामुळे अशा सणांना महिलांना आपली पारंपरिक खेळाची ही हौस पुरवते.

### मंगळागौरीचे पारंपरिक खेळ

मंगळागौर वेळी पारंपरिक खेळ खेळले जाते. या खेळाचा मुख्य हेतू आपल्या संस्कृतीची ओळख या नव्या पिढीला झाली पाहिजे. तसेच व्यायाम देखील व्हायला हवा. हे खेळ खेळल्याने चपळता मिळते, चैतन्य आणि आनंद देणारे असे हे मंगळागौरीचे पारंपरिक खेळ आहेत. या सर्व खेळामुळे शरीराच्या विविध अवयवांचा व्यायाम होतो. खेळामध्ये खेळले जाणारे खेळ म्हणजे वटवाघूळ फुगडी, बस फुगडी, तवा फुगडी, फिगरी फुगडी, वाकडी फुगडी, आगोटापागोटा, साळुंकी, गाठोडे, लाटा बाई लाटा, घोडा हाट, करवंटी झिम्मा, टिपऱ्या, गोफ, सुपलं, सासू-सून भांडण, अडवळ घुमा पडवळ घूम, सवतीचे भांडण, दिंड, घोडा हे सर्व खेळाचे प्रकारांचा समावेश यात असतो. साधारणपणे एकशे दहा प्रकाराचे खेळ यामध्ये खेळले जातात. एकवीस प्रकारच्या फुगड्या, सहा प्रकाराचे आगोटा-पागोटा असतात.

## निवडक



### कर्जतमध्ये युवा महोत्सवाचा शुभारंभ

**कर्जत :** मुंबई विद्यापीठाचे ५८ व्या युवा महोत्सवाचे आयोजन कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालय आणि उरण कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. युवा महोत्सवाचे उदघाटन मुंबई विद्यापीठ सांस्कृतिक समन्वयक डॉ. निलेश सावे यांच्या हस्ते करण्यात आला. या महोत्सवात जिल्ह्यातील २७ महाविद्यालयातील सुमारे साडे बाराशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एकूण ३२ प्रकारचे कार्यक्रम घेण्यात आले. याप्रसंगी झुलकरनैन डाभिया, रमेश ठाकूर, विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, डॉ. वाल्मिक गर्जे, डॉ. पराग कारुळकर, डॉ. दीपक गायकवाड, डॉ. निलोफर खान उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. प्रियांका बांदिवडेकर यांनी केले. या युवा महोत्सवात म्युझिक, फाईन आर्ट, थिएटर साहित्य, वक्तृत्व, वाद विवाद, नृत्य, गायन तसेच रांगोळी, मेहंदी आदी स्पर्धेचे प्रकार असून सतीश सलागरे, संदीप रेडकर, राहुल वैद्य, शीतल रेडकर, नितीन केणी, कृष्णा काटे, विजय जाधव, संजय तोडणकर, मानसी आंबडेकर, दिलीप गडकरी, रामनाथ कातोरे, निलेश सिंघा, विवेक वारभुवन, कांता गावडे, कल्पिता राणे, वैष्णव चव्हाण आदी परीक्षक म्हणून काम पहात आहेत. याप्रसंगी डॉ. अतुल त्रिपाठी, डॉ. रुपाली येवले, डॉ. अरुण चव्हाण, डॉ. सतीश पांडव, डॉ. मारोती लोणे, डॉ. एच. के. जगताप, डॉ. दत्ता हिंगमिरे, प्रा. आर. सी. ठावरे, प्रा. विशाल शेळके, प्रा. अक्षदा गिध, प्रा. सिद्धीका धोपे, प्रा. ऐश्वर्या नारायणकर, प्रा. विनोद इंदुलकर, प्रा. रियाज पठाण, प्रा. अनुपमा कांबळे, प्रा. विनिता तांडेल, प्रा. पूजा गुप्ता, प्रा. दिपू यादव आदी उपस्थित होते.

### ठाकूर-कातकरी समाज एकवटला

**माथेरान :** पनवेल तालुक्यात ठाकूर व कातकरी समाजाने जागतिक आदिवासी दिन उत्सव समितीच्या माध्यमातून आदिवासी दिन साजरा करण्यात आला. यावेळी जागतिक आदिवासी दिन उत्सव समिती पनवेलचे अध्यक्ष कृष्णा वाघमारे, उपाध्यक्ष गणपत वारगडा, अनिल वाघमारे, एकनाथ वाघे गुरुजी, हिरामण नाईक, सी के वाक, धर्मा वाघ, अरुण कातकरी, सीताराम चौधरी, कुंदा पवार, पांडुरंग पारधी, रामदास वाघमारे, आत्माराम भस्मा, रमेश वाघे, अशोक पवार, जना घुटे, रमेश भस्मा, चंद्रकांत संबरी, जनार्दन निरगुडा, पद्माकार चौधरी, सुनिल वारगडा, हिरामण पारधी, बाळू वाघे, राम नाईक, पांडुरंग भगत, मैद्या वाघ आदी आदिवासी बांधव उपस्थित होते.

### रोह्यात शांतता समितीची बैठक



**रोहा :** आगामी सर्व सण-उत्सव शांततेत साजरे करण्यासाठी रोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी रोह्यात शांतता समितीची बैठक शनिवार (दि.९) ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला मयूर दिवेकर, महेश कोलटकर, समीर सकपाळ, रमेश साळवी, अजित मोरे, लालता कुशवाह, महादेव साळवी, समाधान शिंदे, अमित आठवले, रवी चाळके, निलेश चाळके, समीर दळवी, अमय जाधव, नाना सोळंकी, प्रकाश कोळी, राजेश काफरे, स्वप्नील धनावडे, दत्तात्रेय जगताप, वैभव शेलार, विशाल शेलार, राजा शिंदे, नितेश जाधव आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

### झाडाला राखी बांधून रक्षाबंधन

**कोर्लई :** मुरुडच्या जंजिरा विद्या मंडळ संचलित सर एस ए हायस्कूल व स्व. म. ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी शाळेच्या आवारात झाडाला राखी बांधून राखी पौर्णिमा साजरी केली. ज्याप्रमाणे आपल्या बहिणीचे संरक्षण करण्याची जबाबदारी भावाची असते, याची जाणीव ठेवून झाडे देखील आपला भाऊ असून पर्यावरणाचे संरक्षण करत असतात. झाडे लावा झाडे जगवा तरच मानवी जीवनावर होणाऱ्या तापमानाचा परिणाम होणार नाही. आपल्या सर्वांचे मानवी जीवन सुखकर होईल. झाडे आपल्याला सावली देतात, फळे देतात ते निस्वार्थ पणे आपले कर्तव्य पार पाडत असतात. त्याप्रमाणे प्रत्येक नागरिकांनी देखील वृक्ष लागवड करून त्याची वाढ करण्या संदर्भात योग्य तो विचार करून वृक्ष लागवड करून त्याची वाढ करणे ही आज काळाची गरज असल्याचे मनोगतात विद्यार्थीनीनी सांगितले आणि वृक्ष लागवड करून त्याचे संगोपन करण्याचा जबाबदारी प्रत्येकाने घ्यावी असे आवाहन केले. ही संकल्पना संस्थेचे पांडुरंग आरेकर व संगणक केतन वर्तक यांनी अमलात आणली तर शाळेचे मुख्याध्यापक सरोज राणे, भास्कर मोरे यांचे सहकार्य लाभले.



**क्लासिफाईड**
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- 'जन्नावार हॉस्पिटल' बायपास रोड चेंढरे-अलिबाग मध्ये नर्सची जागा (vacancy) आहे. Contact No 7798034509
- आमच्या येथे J.S.W. (जिंदाल) कंपनीचे जुने नवीन कलर कोटेड पत्र्याचे पत्रे मिळतील. संपर्क : बाबू सैय्यद, कोळीवाडा कस्टम ऑफिसच्या बाजूला. मो. ७७४४९२५१६६
- अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२३२३५०५६/८१४९६७३०१८
- दुकान गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग एस टी स्टॅन्ड जवळ ९७६४५४८६७९.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे गोठी, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील सर्व्हे नंबर ३/१, एकूण क्षेत्र ०-१७-८५ हे. आर., आकार ३.५३ रू. पैसे ही भातशेती मिळकत तसेच या मिळकतीत जाण्यायेण्याकरीता निरंतर वहिवाटीकरीता मौजे गोठी, सर्व्हे नं. २ या मिळकतीतून असलेल्या ९ मीटर रूंदीच्या पोच रस्त्याच्या हक्कांगासह, या मिळकतीचे विद्यमान मालक जयश्री राजन साळवी, रा. ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कासह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख ११/०८/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

दिनांक : १२ ऑगस्ट २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे बोरीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|---|
| मंगेश गोपीनाथ भोईर | ५६ | ७ | ०-२२-०० | ०-२० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड,
सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- १२/०८/२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट मिळकत तिचे मालक चंद्रकांत श्रीकांत सिंह यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे. लाडीवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील बिनशेती प्लॉट मिळकत**

| मालकाचे नाव | भूमापन क्र.व उपविभाग/ सर्व्हे नं/ हिस्सा नं | क्षेत्र (चौ.मीटर ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| चंद्रकांत श्रीकांत सिंह | ६१/ प्लॉट नं ४८ | ४७४-०० | ९-४८ |

या मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि तसेच त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी- विकीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही,असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतील जाणार नाही.

ता. १२/०८/२०२५

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड निलेश कान्हू मोरे मोबा. ९८२२६९११०९**
**ॲड वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४**
ऑफिस पत्ता - शॉप नं २९ तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग
प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर अमराई रोड.
कर्जत ता कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे भिसराई, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) शायान साजिद शेख व २) साजिद अख्तार रफिक अहमद शेख यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| भिसराई | ७८ | ०-५०-१० | ८.८१ |
| | | ०-०१-०० | |
| | | ०-५१-१० | |
| | | ०-०३-८० | |
| | पो. ख. | ०-००-५० | |
| | | ०-५५-४० | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १२/८/२०२५

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### ई-निविदा सूचना

प्रादेशिक विद्युत अभियंता, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, शिरवाड, कारवार यांनी खालील कामांसाठी अनुभवी कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवित आहेत: **गोवा राज्यातील कारवार क्षेत्राअंतर्गत कोंकण रेल्वेच्या मडगाव कोच केअर सेंटरमध्ये पारंपारिक प्रकारच्या एसी आणि नॉन एसी प्रवासी कोचिंग स्टॉकसाठी ट्रेन लाइटिंग (टीएल) सिस्टम आणि त्याच्या उपकरणांची दोन वर्षांसाठी वार्षिक व्यापक देखभाल आणि एलएचबी प्रकारच्या एसी आणि नॉन एसी कोचिंग स्टॉकसाठी ट्रेन लाइटिंग (टीएल) सिस्टम आणि त्याच्या उपकरणांची वार्षिक देखभाल. निविदा सूचना क्रमांक: केआर-केडब्ल्यू-ईएल-एएमसी-टी-35-2024आरटी2, दिनांक: 11.08.2025. कामाची किंमत**: रु. 277.60 लाख (जीएसटी वगळून). **बोली सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 02.09.2025 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी, कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्या.

दिनांक : १२ ऑगस्ट २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे बोरीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|---|
| सुरेश हरिश्चंद्र भोईर | ५६ | ८ | ०-२३-०० | ०-२० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड,
सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- १२/०८/२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेल्या बिनशेती जमिन मिळकती त्यांचे मालक श्री. योगेश मजसुखलाल पोपट व श्री. दिनेश भवरलाल नहाटा यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

**मौजे - आसल, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ. मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ८६ | १ | २१५-०० | २१-५० |
| ८६ | २ | ३२२-०० | ३२-२० |
| ८६ | ३ | ४००-०० | ४०-०० |
| ८६ | ४ | ४६८-०० | ४६-८० |
| ८६ | ५ | ५५५-०० | ५५-५० |
| ८६ | ६ | १५६-०० | १५-६० |
| ८६ | ७ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | ८ | १५३ -०० | १५-३० |
| ८६ | ९ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | १० | १५३-०० | १५-३० |
| ८६ | ११ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | १२ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | १३ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | १४ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | १५ | १५०-०० | १५-०० |
| ८६ | १६ | २५६-०० | २५-६० |
| ८६ | १७ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | १८ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | १९ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | २० | १५३-०० | १५-३० |
| ८६ | २१ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | २२ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | २३ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | २४ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | २५ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | २६ | १७१-०० | १७-१० |
| ८६ | २७ | ०९०-०० | ०९-०० |
| ८६ | २८ | ०९०-०० | ०९-०० |
| ८६ | २९ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | ३० | १५३-०० | १५-३० |
| ८६ | ३१ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | ३२ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | ३३ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | ३४ | १६९-०० | १६-९० |
| ८६ | ३५ | १५८-०० | १५-८० |
| ८६ | ३६ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | ३७ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | ३८ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | ३९ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | ४० | १५३-०० | १५-३० |
| ८६ | ४१ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | ४२ | ०९०-०० | ०९-०० |
| ८६ | ४३ | ०९०-०० | ०९-०० |
| ८६ | ४४ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ४५ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ४६ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ४७ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ४८ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ४९ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ५० | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ५१ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ५२ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ५३ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ५४ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ५५ | ५३४-०० | ५३-४० |
| ८६ | ५६ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ५७ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ५८ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ५९ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ६० | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ६१ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ६२ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ६३ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ६४ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ६५ | २४७-०० | २४-७० |
| ८६ | ६६ | २९६-०० | २९-६० |
| ८६ | ६७ | २४६-०० | २४-६० |
| ८६ | ६८ | ३३७-०० | ३३-७० |
| ८६ | ६९ | २५४-०० | २५-४० |
| ८६ | ७० | २१२-०० | २१-२० |
| ८६ | ७१ | १५६-०० | १५-६० |
| ८६ | ७२ | १५३-०० | १५-३० |
| ८६ | ७३ | २७६-०० | २७-६० |
| ८६ | ७४ | २५०-०० | २५-०० |
| ८६ | ७५ | २१३-०० | २१-३० |
| ८६ | ७६ | १८७-०० | १८-७० |
| ८६ | ७७ | १५२-०० | १५-२० |
| ८६ | ७८ | १५०-०० | १५-०० |
| ८६ | ७९ | ४३८-०० | व्हिलेज रोड |
| ८६ | ८० | २७६७-०० | ओपन स्पेस |
| ८६ | ८१ | १३९२-०० | ॲमेनिटी स्पेस |
| ८६ | ८२ | ६९८६-०० | इंटरनल रोड |

तरी वर नमुद मिळकतींशी कोणत्याही इसम, कंपनी, भागीदारी संस्था अथवा अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही.

किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ११/०८/२०२५

**ॲड. तुषार रामचंद्र भवारे**
श्रावणधारा को. ऑप. हौ.सो. ब्राम्हण आळी.
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८५०८००८१३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली स्थावर मिळकत श्री. प्रविण मधुकर नाईक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची मिळकत असून सदरची मिळकत आमचे अशिलांनी त्यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ६, हिस्सा नं. ३, क्षेत्र ०-१०-९ हे.आर. आकार २.२५ रू.पै. आणि सर्व्हे नं. ५, हिस्सा नं. २ अ क्षेत्र ०-०८-० हे.आर. आकार १.६२ रू.पै. या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेल्या नियोजित 'श्वेता-श्रेया सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड या इमारतीमधील तळमजल्यावरील 'बी' विंग मधील निवासी सदनिका क्र. ००२, क्षेत्र ५९५ चौ. फूट बिल्टअप, ग्रामपंचायत चेंढरे मिळकत क्रमांक १५९४/२ ही मिळकत.**

वर नमूद मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बोजा, बक्षिस, मृत्यूपत्र, भाडेपट्टा, जप्ती, लीज, लियन, अन्नवस्त्र-पोटगी, वारसाहक्क अथवा अन्य प्रकारचा कोणताही कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांच्या आत त्यासंबंधातील लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे त्यांचे नमूद पत्त्यावर कळवावी.

या नोटीसमध्ये नमूद केलेल्या मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात न कळविल्यास सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजून तसेच सदर मिळकतीशी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व सदरच्या व्यवहारानंतर कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : ११/०८/२०२५

सही/-
**ॲड. सोनाली जयवंत घरत**
बी.ए; एल.एल.बी.
बी/१०२, 'चित्रा तारांगण' महर्षी कर्वे रोड,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची बागायत जमीन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्रीमंत धोडींबा वाघमारे, २) महेश सुदाम जानवळे, ३) निलेश वसंत म्हात्रे यांचेकडून त्यांचे मालकीचे बागायत जमीन मिळकत कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता. अलिबाग | २२६६ | ००.२४.५० <br> पो.ख. ००.०१.३० <br> एकूण ००-२५-८० | ११.८८ |

वरील बागायत मिळकतीपैकी १) श्रीमंत धोडींबा वाघमारे, २) महेश सुदाम जानवळे, ३) निलेश वसंत म्हात्रे यांचे मालकीचे एकूण बागायत क्षेत्र ००.०५.१० हे.आर. आकार ०२.४७ रू. पैसे या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्याप्रमाणे क्षेत्राची जमीन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ११/०८/२०२५

**ॲड. राहूल रमेश नाईक**
मु. नागाव, ता. अलिबाग
मोबा.क्र. ९९२२७९८५२८

## जाहीर सूचना

असे सूचित करण्यात येते की, श्रीम. अनुपा तन्ना शाह यांचेकरिता श्री. मनिष सुरजी छेडा, अधिकृत स्वाक्षरीकर्ता तथा प्रकल्प अधिकारी यांच्या मौजे मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाजगी जमीन गट क्र. 168 करिता पोहोच रस्त्यासह पाण्याची पाईपलाईन, इलेक्ट्रिकल लाईन, रस्त्यालगत ड्रेनेज लाईन बांधकामासाठी आणि इतर उपयुक्त सेवा इ. कामाकरिता मौजे मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील 0-0236 हेक्टर संरक्षित वनजमिन वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करण्याच्या प्रस्तावास भारत सरकार (एम.ओ.इ.एफ.सी.सी.) प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र. ऑनलाईन प्रस्ताव नं. एफपी/एमएच/रोड/479772/2024, दिनांक 01/10/2024 आणि पत्र क्र. ऑनलाईन प्रस्ताव नं. एफपी/एमएच/रोड/479772/2024, दिनांक 06/01/2025 अन्वये अनुक्रमे तत्वत: मान्यता व अंतिम मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.
तसेच महाराष्ट्र शासन (वन विभाग), मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वनवृत्त, ठाणे यांचेकडील आदेश जा. क्र. कक्ष-10/वसं/प्र.क्र.59/24-25/51/2025-26 दिनांक 23/05/2025 अन्वये मौजे मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील जुना सर्व्हे नं. 96/1/1 येथे पाण्याची पाईपलाईन, विद्युत वाहिनी, नाले लाईन व इतर सेवांकरिता दळणवळण रस्ता बांधण्यासाठी वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत 0.0236 हेक्टर संरक्षित वनजमीन वळतेकरण प्रस्ताव एकरेषीय (स्पदमंत) प्रकल्पास काम सुरु करण्याची (Working Permission) परवानगी सुद्धा देण्यात आलेली आहे. सदरची परवानगी खालील अटी/ शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून देण्यात आली आहे.

1) सदर परवानगी प्रकल्पांतर्गत प्रस्तावित वळतेकरण वनक्षेत्रात कामे सुरु करणे पुरती मर्यादित आहे. आणि सदर परवानगी एक वर्षासाठीच म्हणजेच दि.23.05.2026 पर्यंतच वैध (Valid) राहील म्हणजेच सदर परवानगी दिनांक 24.06.2026 पासून आपोआप रद्द झालेचे समजण्यात येईल. सदर परवानगी जारी झाल्यानंतर एक वर्षाचे कालावधीत प्रकल्प यंत्रणेस केंद्र शासन तत्वत: व अंतीम मान्यता पत्रातील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करुन राज्य शासनाकडून वळतेकरण आदेश प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. सदर परवानगीस मुदतवाढ देणे या कार्यालयाच्या अधिकारात येत नसल्याने एक वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतर प्रस्तावांतर्गत क्षेत्रात काम सुरु ठेवण्यासाठी या कार्यालयास पत्रव्यवहार प्रकल्प यंत्रणेस करता येणार नाही.
2) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 1.3 अन्वये 100 वृक्षांच्या लागवड व देखभाल करीता प्रकल्प यंत्रणेने रक्कम रुपये 2,54,025/- कॅम्पा प्राधिकरणाकडे दिनांक 05.11.2024 रोजी अदा केलेले आहेत.
3) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 1.4 अन्वये नक्त वर्तमान मुल्य अंतर्गत प्रकल्प यंत्रणेने रक्कम रुपये 26,359/- कॅम्पा प्राधिकरणाकडे दिनांक 05.11.2024 रोजी अदा केलेले आहेत.
4) केंद्रशासन पत्रातील अट क्रमांक 1.8 नुसार जिल्हाधिकारी- रायगड यांचेकडील दि.03.04.2025 रोजीचे वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र प्रकल्प यंत्रणेने सादर केलेले आहे. प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक/पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन / मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील. बाबत प्रकल्प यंत्रणेने बंधपत्र सादर केलेले आहे.
5) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 1.11 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने सदर प्रकल्पासाठी आवश्यकतेनुसार पर्यावरणीय मान्यता मिळविणेबाबत नमूद केले आहे. याबाबत प्रकल्प यंत्रणेने बंधपत्र सादर केले आहे.
6) प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावित क्षेत्रात कामे सुरु करण्यापुर्वी, उप वनसंरक्षक अलिबाग यांना कळविणे आवश्यक आहे. उप वनसंरक्षक अलिबाग यांनी कामे सुरु असताना प्रस्तावित वन जमिनीवर वनभंग झाला आहे का ते पाहणे. वनभंग झाल्याचे निदर्शनास आल्यास केंद्र शासनाचे पर्यावरण, वन व जलवायु मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील Hand Book मधील परिच्छेद क्र. 1.21 अनुसार कारवाई करतील.
7) प्रकल्पामुळे प्रकल्पांतर्गत क्षेत्रातील पक्षी / वन्यजीवांचे वस्तीस्थान नष्ट न होता अबाधित राहण्याकरीता काही उपाययोजना सुचविल्यास आवश्यक ती उपाययोजना प्रकल्प यंत्रणा करेल.
8) प्रकल्पांतर्गत वनक्षेत्रात प्रकल्प प्राधिकरणाकडून कामे करताना वनसंपदेचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे.
9) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 1.1, 1.2, 1.5, 1.6, 1.7, 1.9, 1.10, 1.12, 1.13, 1.14, 1.16, 1.17, 1.18, 1.19 व 1.20 बाबत प्रकल्प यंत्रणेने दिलेले बंधपत्रातील मुद्द्यांबाबत प्रकल्प प्राधिकरणाकडून विहित कालावधीत पूर्तता केली जाईल याबाबत उप वनसंरक्षक, अलिबाग यांची जबाबदारी राहील.

उपरोक्त अटी पैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (Non Compliance) उप वनसंरक्षक, अलिबाग हे वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत केंद्र शासनाचे पर्यावरण, वन व जलवायू मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील Hand Book मधील परिच्छेद क्रमांक 1.21 अनुसार अहवाल सादर करतील.

**अनुसूची**

| अनू. क्र. | तालुका | गाव | जुना सर्व्हे नं. | वन क्षेत्र (हेक्टर मध्ये) | वनाचा वैधानिक दर्जा |
|---|---|---|---|---|---|
| 1. | अलिबाग | मापगाव | 96/1/1 | 0.0236 | संरक्षित वन |

वर नमूद तत्वत: मान्यता व अंतिम मान्यता पत्र केंद्र शासनाच्या www.parivesh.nic.in या संकेत स्थळावर आणि महाराष्ट्र शासन वनविभागाचे आदेश हे www.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

दिनांक : 11/08/2025
ठिकाण : मुंबई

सही/-
**श्रीम. अनुपा तन्ना शाह यांचे करिता,**
**श्री. मनिष सुरजी छेडा,**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**तथा प्रकल्प अधिकारी**
कार्या.: ३ रा मजला, देविदास मेन्शन, मेरेवेदर रोड,
कुलाबा, मुंबई - ४०० ००१.

MAHARASHTRA TOURISM

**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित, मफतलाल हाऊस, पहिला मजला, एच.टी. पारेख मार्ग, १६९, बॅकबे रिक्लमेशन, चर्चगेट, मुंबई- ४०००२०**
**दूरध्वनी : (९१२२) ४१५८०९९२/४१५८०९९४/९५/९७**

### निविदा सुचना/मपविम/बांधकाम/२०२५-२६/३६-६४ (ऑनलाईन)

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचेकडून खालील कामांसाठी (अधिकृत डिजीटल स्वाक्षरी प्रमाणधारक) विस्तृत निविदा सूचनेत नमूद केलेल्या पूर्व अर्हता पात्र संस्थांकडून ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (लक्ष) |
|---|---|---|
| १ | एलोरा, जि. छत्रपती संभाजीनगर येथे म.प.वि. महामंडळाच्या राष्ट्रकुट रिसॉर्टसाठी विद्युत कामे करणे | ३१.९६ |
| २ | माथेरान, जि. रायगड येथील म.प.वि. महामंडळाच्या निरीक्षण बंगल्यासाठी विद्युत कामे करणे | ३३.८५ |
| ३ | नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा येथील म.प.वि. महामंडळाच्या हॉलिडे रिसॉर्ट आणि स्टडी सेंटरचे विद्युत काम करणे | ३८.९८ |
| ४ | कळंब, जि. यवतमाळ येथील म.प.वि. महामंडळाच्या भक्त निवासासाठी विद्युत कामे उपलब्ध करणे | ४०.४० |
| ५ | ताडोबा, जि. चंद्रपूर येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्टचे अतिरिक्त सुविधेसाठी विद्युत कामे करणे | ६५.५८ |
| ६ | म.प.वि. महामंडळाच्या संकटमोचन, जि. यवतमाळ येथील पर्यटन सुविधेसाठी विद्युत कामे करणे | ७३.२० |
| ७ | अक्कलकोट जि. सोलापूर येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्ट आणि कम्युनिटी हॉलसाठी विद्युत कामे करणे. | ७४.९६ |
| ८ | नलेश्वर, जि. चंद्रपूर येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्ट व विविध पर्यटन विकास कामांसाठी विद्युत कामे करणे. | ७७.०५ |
| ९ | पर्यटक निवास नागपूर, जि. नागपूर येथे अतिरिक्त पर्यटन सुविधा प्रदान करणे. | ७७.८८ |
| १० | कोयनानगर, जि. सातारा येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्टची विद्युत कामे करणे. | ७९.३६ |
| ११ | म.प.वि. महामंडळाचे रिसॉर्ट शिखर शिंगणापूर, जि. सातारा येथे अतिरिक्त पर्यटन सुविधा उभारणे. | १०३.९३ |
| १२ | म.प.वि. महामंडळाचे रिसॉर्ट माहूर, जिल्हा नांदेड येथे अतिरिक्त पर्यटक सुविधांसाठी विद्युत कामे करणे. | ११३.१५ |
| १३ | अकलूज, जि. सोलापूर येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्टमधील विद्यमान सुविधांसाठी विद्युत कामे करणे. | ११९.२८ |
| १४ | ज्योतिबा, जि. कोल्हापूर येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्टमधील विद्यमान सुविधांमध्ये विद्युत कामे करणे. | १२३.९१ |
| १५ | कुणकेश्वर, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथील म.प.वि. महामंडळाच्या स्कूबा डायव्हिंग सेंटर आणि संग्रहालयाच्या विकासासाठी विद्युत कामे करणे. | १२४.९८ |
| १६ | शिर्डी, जि. अहिल्यानगर येथील म.प.वि. महामंडळाच्या पर्यटक निवासात अतिरिक्त सुविधा पुरविणे. | १२९.७३ |
| १७ | पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्टची विद्युत कामे करणे. | १३४.५१ |
| १८ | नवेगाव खैरी, जि. नागपूर येथे म.प.वि. महामंडळाच्या नवीन उपहारगृहाचे बांधकाम करणे. | १४७.७६ |
| १९ | ताडोबा, जि. चंद्रपूर येथील म.प.वि. महामंडळाच्या पर्यटक निवासात विविध पर्यटन विकास कामे करणे. | १५९.४४ |
| २० | सती अनुसया माता संस्थान, ता. काटोल, जि. नागपूर येथे विविध पर्यटन विकास कामे करणे. | १६५.३५ |
| २१ | महाराष्ट्राच्या पश्चिम भागात UNWTO मान्यताप्राप्त पर्यटन माहिती प्रणाली प्रदान करणे. | १८२.१२ |
| २२ | सिंधुदूर्ग जिल्ह्यातील विविध समुद्रकिनाऱ्यांवर विकसित केलेल्या पर्यटन सुविधांचे (लाकडी संरचना) बळकटीकरण आणि वार्षिक देखभाल करणे. | १९२.५८ |
| २३ | नवेगावबांध, जि. गोंदिया येथील म.प.वि. महामंडळाचे रिसॉर्टचे अतिरिक्त सुविधेसाठी विद्युत कामे करणे. | १९५.१० |
| २४ | खारेपाटण, जि. सिंधुदुर्ग येथील पर्यटक सुविधांचे श्रेणीवाढ करणे. | २०२.९७ |
| २५ | दुर्गा टेकडी, लोणार, जि. बुलढाणा येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्टसाठी विद्युत कामे करणे. (दुसरी बोली) | २२२.५६ |
| २६ | नलेश्वर, जि. चंद्रपूर येथील म.प.वि. महामंडळाच्या पर्यटक निवासामध्ये विविध पर्यटन विकास कामे करणे | २९५.५८ |
| २७ | गणपतीपुळे, जि. रत्नागिरी येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्टसाठी विद्युत कामे करणे | २९९.०१ |
| २८ | नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा येथील हॉलिडे रिसॉर्ट आणि स्टडी सेंटरची श्रेणीवाढ करणे | ३६१.८७ |
| २९ | नाशिक येथील कन्व्हेशन सेंटरमध्ये अतिरिक्त सुविधा आणि परिसर विकास कामे करणे | ३९४.५२ |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा व सादर करावयाचा कालावधी | दि. १२/०८/२०२५ दु. १३.०० वा. पासून दि. २०/०८/२०२५ दु. १३.०० पर्यंत |
| २ | निविदा हार्ड कॉपी स्वरूपात सादर करावयाचा कालावधी | दि. २०/०८/२०२५ दु.१३.०० वा. आणि दि. २२/०८/२०२५ दु. १३.०० पर्यंत |
| ३ | निविदा उघडण्याचे दिनांक व वेळ | दि. २२/०८/२०२५ दु. १५.०० hrs (शक्य झाल्यास) |
| ४ | शुद्धीपत्रक | उपरोक्त ई-निविदा संबंधीचे सूचना व शुद्धीपत्रक फक्त ऑनलाईन पद्धतीनेच दर्शविल्या जातील. |

खालील संकेतस्थळावरून विस्तृत निविदा सूचना व ई-निविदेची माहिती उपलब्ध आहे.
htttp://mahatenders.gov.in

sd/-
**व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई**

# रोहित, विराटला सक्ती?

## बीसीसीआय देशांतर्गत सामने खेळण्याची सूचना करण्याची शक्यता

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

कसोटी आणि ट्वेन्टी-२० क्रिकेटमधून निवृत्त झालेल्या रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या एकदिवसीय कारकीर्दीलाही धोका निर्माण झाला आहे. दोन वर्षांनी आफ्रिकेत होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकासाठी रोहित आणि विराटचा विचार करण्याबाबत भारतीय संघ व्यवस्थापन साशंक आहे. त्यातच आता भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) या दोघांना विजय हजारे करंडक या देशांतर्गत एकदिवसीय स्पर्धेत खेळण्याची सक्ती करण्याची शक्यता असून ते या सूचनेचे पालन करतात का, हे पाहणेही महत्त्वाचे ठरणार आहे.

रोहितच्या नेतृत्वाखाली भारताने याच वर्षी चॅम्पियन्स करंडक एकदिवसीय स्पर्धेचे जेतेपद पटकावले होते. त्यानंतर रोहित आणि विराट हे दोघेही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेले नाहीत. या दोघांनी गेल्या वर्षी ट्वेन्टी-२० विश्वचषकातील जेतेपदानंतर क्रिकेटच्या लघुत्तम प्रारूपाला अलविदा केले होते. तसेच त्यांनी कसोटीतूनही निवृत्त होण्याचा निर्णय घेतला. आता ते केवळ एकदिवसीय क्रिकेटवर लक्ष केंद्रित करणार आहेत. मात्र, २०२७च्या विश्वचषकापूर्वी भारतीय संघ एकदिवसीय प्रारूपात मर्यादित सामनेच खेळणार आहे. त्यामुळे पुढील दोन वर्षे हे दोघे लय आणि तंदुरुस्ती राखू शकणार का, असा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

### सरावाला सुरुवात

भारतीय संघ ऑक्टोबरमध्ये ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जाणार असून यात तीन एकदिवसीय सामनेही खेळेल. या मालिकेतून रोहित आणि विराट यांचे आंतरराष्ट्रीय स्तरावर पुनरागमन होण्याची शक्यता आहे. या मालिकेच्या दृष्टीने विराटने सरावाला सुरुवात केली आहे. याचे छायाचित्र त्याने काही दिवसांपूर्वी समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केले होते. विराट आता इंग्लंडमध्ये वास्तव्यास असून लंडनमध्ये तो सराव करत असल्याचे समजते.



याच दृष्टीने बीसीसीआय आणि निवड समिती या दोघांना विजय हजारे करंडक एकदिवसीय स्पर्धेत खेळण्याची सूचना करण्याची दाट शक्यता आहे. विराट आणि रोहित यांचा २०२७च्या विश्वचषकासाठी विचार केला जाणे अवघड आहे. मात्र, बीसीसीआयच्या सूत्राने वृत्तसंस्थेशी बोलताना या वृत्ताला दुजोरा देणे टाळले. भारतीय संघ सध्या आगामी आशिया चषक आणि पुढील वर्षीच्या होणारी ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धा यावर लक्ष केंद्रित करत असल्याचे सूत्राकडून सांगण्यात आले.

विजय हजारे करंडक स्पर्धा सुरू असतानाच भारतीय संघाचे न्यूझीलंडविरुद्ध तीन एकदिवसीय सामने होणार आहेत. त्यामुळे रोहित आणि विराटला विजय हजारे करंडकात खेळण्याची सूचना करण्यात आली, तरी ते दोन किंवा तीन सामनेच खेळू शकतील,असेही सूत्राने सांगितले.

रोहितच्या निवृत्तीनंतर कसोटी संघाची धुरा शुभमन गिलकडे सोपविण्यात आली. गिलच्या नेतृत्वाखाली अननुभवी भारतीय संघाने खडतर अशा इंग्लंड दौऱ्यातील कसोटी मालिका २-२ अशी बरोबरीत सोडवली. या मालिकेत दोन वेळा भारतीय संघाने पिछाडीवरुन पुनरागमन केले. त्यामुळे गिलच्या नेतृत्वगुणांची निवड समितीला खात्री पटली असून एकदिवसीय क्रिकेटमध्येही त्याच्यावर ही जबाबदारी देणे योग्य ठरेल अशी त्यांची धारणा असल्याचे समजते.

भारतीय संघाची पुढील एकदिवसीय मालिका ऑक्टोबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध रंगणार आहे. यात रोहित नेतृत्व करणार आणि विराटचाही संघात समावेश केला जाणार हे जवळपास निश्चित आहे. परंतु या मालिकेत चमक दाखविण्यात अपयश आल्यास या दोघांच्या एकदिवसीय संघातील स्थानाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. ऑस्ट्रेलियाचा आगामी दौरा हा दोन्ही खेळाडूंचा अखेरचा एकदिवसीय दौरा असू शकतो अशी चर्चा आहे.

## निवडक



### मॅरेथॉनमध्ये धर्मेंद्र अन् रविनाची बाजी

**ठाणे :** मॅरेथॉन ठाण्याची... ऊर्जा तरुणाईची...या घोषवाक्यासह आयोजित करण्यात आलेल्या ३१व्या ठाणे महानगरपालिका वर्षा मॅरेथॉन या शर्यतीत पुरुष विभागात पुण्याच्या एसएसआयच्या धर्मेंद्र याने तर महिला विभागात नाशिकच्या रवीना गायकवाड हिने बाजी मारली.या स्पर्धेत सुमारे २५ हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. त्यामध्ये सर्वात कमी वेळेत नियोजित अंतर कापत या दोघांनी पहिले पारितोषिक पटकावले. रविवारी (दि. १०) सकाळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पत्नी लता शिंदे यांनी मॅरेथॉनला झेंडा दाखवल्यानंतर स्पर्धेला सुरुवात झाली. विशेष म्हणजे पाच वर्षांनंतर रंगलेल्या या मॅरेथॉनमध्ये तोच उत्साह आणि तीच ऊर्जा पाहायला मिळाली. ठाणे महानगरपालिका आणि ठाणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या ३१व्या वर्षा मॅरेथॉनचे रविवारी आयोजन करण्यात आले होते. ठाणे वर्षा मॅरेथॉन शर्यत विविध १२ प्रकारांत झाली. विजेत्यांना एकूण १० लाख ३८ हजार ९०० रुपयांची रोख पारितोषिके देण्यात आली. मॅरेथॉन स्पर्धेतील विजेत्यांना देण्यात येणाऱ्या पारितोषिकांमध्ये वाढ करण्यात आली. २१ किमी शर्यतीतील विजेत्यास एक लाखाचे रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह, मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

### भारतीय महिला अ संघाची निराशा

**टी-२० मालिकेत ३-० ने अपयश**

**मॅके :** भारतीय महिला अ क्रिकेट संघाची टी-२० मालिकेतील निराशा रविवारीही कायम राहिली. यजमान ऑस्ट्रेलिया अ महिला संघाने भारत अ महिला संघावर चार धावांनी विजय मिळवला आणि तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत ३-० असे निर्भेळ यश संपादन केले. ऑस्ट्रेलिया अ संघाकडून भारत अ संघासमोर १४५ धावांचे आव्हान ठेवण्यात आले होते. ऑस्ट्रेलिया अ संघातील गोलंदाजांनी प्रभावी कामगिरी केली. निर्णायक क्षणी ठसा उमटवला. शेफाली वर्मा हिने ४१ धावांची, राघवी बिस्त हिने २५ धावांची आणि मीनू मणी हिने ३० धावांची खेळी केली, मात्र कुणालाही मोठी खेळी करता आली नाही. भारतीय अ संघाला २० षटकांत आठ बाद १४० धावांपर्यंत मजल मारता आली. सियाना जिंजर हिने १६ धावा देत चार फलंदाज बाद केले व भारत अ संघाला बांधून ठेवले. त्याआधी भारत अ संघातील गोलंदाजांनीही अचूक टप्प्यात गोलंदाजी केली. एलिसा हिने २७ धावांची, अनिका रिरॉयड हिने २२ धावांची आणि मॅडेलिन पेना हिने ३९ धावांची खेळी केली. ऑस्ट्रेलिया अ संघाने २० षटकांत आठ बाद १४४ धावा केल्या. भारत अ संघाकडून राधा यादव हिने ३१ धावा देत तीन फलंदाज बाद केले. तसेच प्रेमा रावत हिने २४ धावा देत तीन फलंदाजांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.

### शाहीन आफ्रीदीने जगाला केलं चकीत

**मुंबई :** शाहीन आफ्रिदीने वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात इतिहास रचला. या सामन्यात शाहीन आफ्रीदीने चार विकेट्स घेतल्या. आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेटमध्ये ६५ सामन्यात सर्वाधिक विकेट्स घेणारा तो गोलंदाज ठरला. या कामगिरीसह त्याने अफगाणिस्तानचा ऑलराउंडर रशीद खानचा विश्व विक्रम मोडला. रशीदने ६५ एकदिवसीय सामन्यांत १२८ विकेट्स घेतल्या. तर, शाहीन आफ्रीदीने इतक्यात सामन्यात १३१ विकेट्स घेतल्या आहेत. याशिवाय, शाहीनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ३५० विकेट्स पूर्ण केल्या आहेत. शाहीन हा पाकिस्तानचा ११वा गोलंदाज आहे, ज्याने असे केले आहे. पाकिस्तानसाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेण्याचा विक्रम वसीम अक्रमच्या नावावर आहे. वसीमने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकूण ९१६ विकेट्स घेतल्या आहेत.६५ एकदिवसीय सामन्यांनंतर सर्वाधिक विकेट्स१) शाहीन शाह आफ्रिदी- १३१ विकेट्स२) रशीद खान- १२८ विकेट्स३) मिचेल स्टार्क- १२६ विकेट्स४) सकलेन मुश्ताक- १२२ विकेट्स५) शेन बाँड- १२२ विकेट्सपाकिस्तानचा दणदणीत विजयवेस्ट इंडिजने सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ४९ षटकांत २८० धावा केल्या. वेस्ट इंडिजकडून एविन लुईसने सर्वाधिक धावा केल्या. एविन लुईसने ६० धावांची खेळी केली. याशिवाय, शाई होपने ५५ आणि रोस्टन चेसने ५३ धावा केल्या. पाकिस्तानकडून शाहीनने ८ षटकांत ५१ धावांत ४ विकेट्स घेतल्या आहेत.



### अर्शदीपला खुणावतोय शतकी रेकॉर्ड

**मुंबई :** आशिया कप स्पर्धेच्या १७ व्या हंगामातील सामने युएईच्या मैदानात खेळवण्यात येणार आहेत. ९ सप्टेंबरपासून रंगणाऱ्या या स्पर्धेत भारतीय संघाचा पहिला सामना १० सप्टेंबरला नियोजित आहे. आशिया कप स्पर्धेसाठी भारतीय संघात कुणाची वर्णी लागणार ते अजून गुलदस्त्यातच आहे. पण काही नावे जवळपास फिक्स आहेत. त्यातीलच एक चेहरा म्हणजे अर्शदीप सिंग. युएईच्या मैदानात उतरून त्याला मोठा डाव साधण्याची संधी असेल. अर्शदीप सिंग हा टी-२० मधील भारताचा सर्वात यशस्वी गोलंदाज आहे. आशिया कप स्पर्धाही याच प्रकारात खेळवण्यात येणार असल्यामुळे त्याला संघात स्थान मिळणं हे निश्चित आहे. या गोलंदाजाने २०२४ च्या हंगामातील टी-२० वर्ल्ड कप जिंकण्यात मोलाचा वाटा उचलला होता. आता आशिया कप स्पर्धेत त्याच्याकडून मोठ्या कामगिरीची अपेक्षा असेल. पंजाबी गोलंदाजानं आतापर्यंतच्या आपल्या टी-२० कारकिर्दीत ६३ सामन्यात ९९ विकेट्स घेतल्या आहेत. हा आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये भारताकडून सर्वाधिक विकेट्स घेण्याचा रेकॉर्ड आहे. आणखी एक विकेट आपल्या खात्यात जमा करताच तो क्रिकेटच्या छोट्या फॉर्मेटमध्ये शंभर विकेट्सचा टप्पा गाठणारा पहिला भारतीय गोलंदाज ठरेल.



## तायक्वॉन्डो स्पर्धेसाठी सुभाष पाटील यांची पंचपदी निवड

| चिरनेर | प्रतिनिधी |

गोल्ड कोस्ट , क्वीन्सलँड ऑस्ट्रेलिया येथे १३ आगस्ट ते १७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत होणाऱ्या वर्ल्ड तायक्वॉन्डो प्रेसिडेंट कप, ओशनिया पॅरा व ऑस्ट्रेलियन ओपन तायक्वॉन्डो स्पर्धेसाठी पंच म्हणून महाराष्ट्रातून एकमेव आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तसेच कॉमनवेल्थ रेफरी तायक्वॉन्डो युनियनचे सदस्य सुभाष पाटील यांची निवड झाली आहे.

सुभाष पाटील हे सातवी डिग्री ब्लॅक बेल्ट व आंतरराष्ट्रीय पंच आहेत. त्या आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पंच म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली आहे.



यात आंतरराष्ट्रीय ज्युनिअर तायक्वॉन्डो स्पर्धा दक्षिण कोरिया २००४ भारतीय संघाचे कोच, पंच पहिली आंतरराष्ट्रीय स्पर्धा २०१० भारत, पंच कॉमनवेल्थ स्पर्धा २०११ भारत, आंतरराष्ट्रीय तायक्वॉन्डो स्पर्धा दक्षिण कोरिया २०११ भारतीय संघाचे कोच, पंच ११वी इजराइल ओपन तायक्वॉन्डो स्पर्धा २०१३, पंच ८ वी स्कॉटिश ओपन स्पर्धा २०१३ स्कॉटलंड, संघप्रमुख कोरिया ओपन २०१४ आंतरराष्ट्रीय साफ गेम २०१६, लुसोफोतीया तायक्वॉन्डो स्पर्धा नियंत्रक २०१४ गोवा, कॅनडा ओपन व पॅरा ओपन तायक्वॉन्डो चॅम्पियनशिप २०१७ तसेच २०१८ ते २०२२ पर्यंत अनेक पंच प्रशिक्षण व स्पर्धामध्ये सहभागी होऊन उत्कृष्ट कामगिरी केली आहे. महाराष्ट्र ,रायगड तायक्वॉन्ड असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसह नवी मुंबई महानगरपालिकेची उपायुक्त अभिलाषा म्हात्रे या सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## रुमेशने मोडला राष्ट्रीय विक्रम

**मुंबई :** रुमेश पाथिरागे हा श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज होता, पण आता तो भालाफेकीत चमकत आहे. त्याने ८६.५० मीटर भाला फेकून राष्ट्रीय विक्रम मोडत वर्ल्ड चॅम्पियनशिपसाठी पात्रता मिळवली. २०१७ मध्ये क्रिकेटमधून बाहेर पडून त्याने भालाफेकीत करियर करण्याचा निर्णय घेतला. ज्याने भालाफेकीमध्ये करियर घडवण्यासाठी क्रिकेट थांबवलं. या खेळाडूचं नाव आहे, रुमेश पाथिरागे. एकेकाळचा श्रीलंकेचा उदयोन्मुख वेगवान गोलंदाज असलेला पथिरागे सध्या श्रीलंकेचा भालाफेकीतील सर्वात मोठे आशा स्थान बनला आहे.

## रोहितपाठोपाठ शुबमन गिलची बादशाहत सेफ?

| मुंबई | वृत्तसंस्था |

पाकिस्तानचा माजी कर्णधार आणि स्टार बॅटर बाबर आझम सध्या धावांसाठी संघर्ष करताना दिसतोय. कामगिरीतील सातत्याच्या अभावामुळे टी-२० संघातून त्याचा पत्ता आधीच कट झालाय. त्यात आता वनडेतही त्याचा फ्लॉप शो दिसून आला. वेस्ट इंडिज विरुद्धच्या वनडे मालिकेत पहिल्या सामन्यात त्याने ४७ धावांची खेळी केली. पण दुसऱ्या वनडेत त्याच्या पदरी भोपळा पडला. त्यामुळे इथंही त्याच्यावर दबाव निर्माण झाला आहे. बाबर आझमचा टी-२० संघातून पत्ता कट झाल्यामुळे हिटमॅन रोहित शर्माचा छोट्या फॉर्मेटमधील सर्वाधिक धावांचा विक्रम मोडीत काढण्यापासून तो लांब राहिला. आता वनडेतील फ्लॉप शोमुळे शुबमन गिलची बादशाहत सेफ राहिल, असे दिसून येते.

मागच्या ६३ डावात शतकी दुष्काळ, जी मोठी खेळी आली ती नेपाळविरुद्ध वनडेत बाबर आझमला मागील ६३ डावात एकही शतक झळकावता आलेले नाही. २०२३ मध्ये आशिया कप स्पर्धेतील वनडेत तेही नेपाळविरुद्ध त्याच्या भात्यातून शेवटचं शतक पाहायला मिळालं होते. या सामन्यात त्याने १५१ धावांची खेळी केली होती. त्यानंतर क्रिकेटच्या तिन्ही प्रकारात तो शतक ठोकण्यात अपयशी ठरलाय. वेस्ट इंडिज विरुद्धच्या सामन्यात जायडन सीन्स याने बाबर आझमचा त्रिफळा उडवला. ७१९ दिवसांनी त्याच्यावर वनडेत शून्यावर बाद होण्याची नामुष्की ओढावली. क्रिकेटच्या या प्रकारात पाचव्यांदा त्याच्यावर ही वेळ आली. याआधी ऑगस्ट २०२३ मध्ये अफगाणिस्तान विरुद्धच्या सामन्यात तो शून्यावर बाद झाला होता.

टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत रोहित शर्मा अव्वलस्थानी आहे. २०२४च्या टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेनंतर त्याने या प्रकारातून निवृत्तीची घोषणा केलीये. पण अजूनही तो टॉपला आहे. बाबर आझम हिटमॅन रोहितचा वर्ल्ड रेकॉर्ड मोडण्याच्या अगदी उंबरठ्यावर आहे. पण पाकिस्तानच्या टी-२० संघातून त्याला बाहेरचा रस्ता दाखवल्यामुळे रोहित शर्माचा रेकॉर्ड सेफ झोनमध्ये आला. वेस्ट इंडिज विरुद्धच्या मालिकेत दमदार कामगिरी करून आयसीसी वनडे क्रमवारीत नंबर होण्याची संधी बाबर आझमला होती. शुबमन गिलला मागे टाकून तो पुन्हा वनडेत बादशात मिरवणार का? अशी चर्चाही रंगली. पण वेस्ट इंडिज विरुद्धच्या त्याच्या फ्लॉप शोमुळे शुबमन गिलचे स्थानही सेफ झाले.



## यश दयालवर बंदीची कारवाई

**मुंबई :** तब्बल १८ वर्षांच्या कालावधीनंतर २०२५ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला विजेतेपद मिळाले. च्या विजयात डावखुरा वेगवान गोलंदाज यश दयाल याची मोलाची भूमिका होती. पण त्यानंतर गोलंदाज यश दयालवर सुरु झालेली संकटे कमी होताना दिसत नाहीत. बलात्कार प्रकरणात अडकलेल्या यश दयालची कारकीर्द आता धोक्यात आल्याचे दिसून येत आहे. यश दयालवर १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. त्यानंतर त्याला अटकेचा धोका निर्माण झाला आहे. याचदरम्यान, त्याला एका मोठ्या लीगमधून वगळण्यात आले आहे. यूपी क्रिकेट असोसिएशनने हा निर्णय घेतला आहे. वेगवान गोलंदाज पुढील हंगामात खेळू शकणार नाही.

## टिम डेव्हिडने मोडला सूर्याचा विश्वविक्रम

| मुंबई | वृत्तसंस्था |

ऑस्ट्रेलियन संघाने पहिल्या टी २० सामन्यात दक्षिण आफ्रिकेला १७ धावांनी पराभूत केले. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने १७८ धावा केल्या. ७५ धावांत ६ बळी गमावल्यानंतर ऑस्ट्रेलियाची गाडी रुळावरून घसरली असे वाटत होते. पण टिम डेव्हिडने सामन्याचा रंगच बदलून टाकला. स्टार फलंदाज टिम डेव्हिडने ५२ चेंडूत ८३ धावा कुटल्या. या खेळीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने १७८ धावा केल्या. प्रत्युत्तरात आफ्रिकेला १६१ धावाच करता आल्या. या डावात टिम डेव्हिडने सूर्यकुमार यादवचा विक्रम मोडला.

टीमने ८३ धावांची खेळी केली. टिम डेव्हिडने त्याच्या डावात ५२ चेंडूंचा सामना केला. त्याने पहिल्यांदाच ५० पेक्षा जास्त चेंडू खेळले. यापूर्वी, त्याने २०२० मध्ये हाँगकाँगविरुद्ध टी डावात सर्वाधिक ४६ चेंडू खेळले होते. टिम डेव्हिड हा आता सर्वाधिक स्ट्राईक रेट असलेला फलंदाज बनला आहे. सूर्यकुमार यादवचा टी आंतरराष्ट्रीय सामन्यात स्ट्राईक रेट १६७.०७ आहे. पण आता टिम डेव्हिडचा स्ट्राईक रेट १६७.३७ झाला आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी २० सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून सर्वाधिक ८ षटकार मारण्याचा नवा विक्रम टिम डेव्हिडने रचला. यापूर्वी हा विक्रम सहा षटकारांचा होता. २००९ मध्ये मेलबर्नमध्ये डेव्हिड वॉर्नरने ८९ धावा करताना सहा षटकार खेचले होते. २००९ मध्ये जोहान्सबर्गमध्ये ८८ धावांच्या खेळीदरम्यान डेव्हिड हसीनेही हा आकडा गाठला होता. तर २०२३ मध्ये मिशेल मार्शने डर्बनमध्ये ७९ धावांच्या खेळीत सहा षटकार मारले आणि दोन दिवसांनी ट्रेव्हिस हेडनेही डर्बनमध्ये ९१ धावा करताना सहा षटकार मारले होते.

दक्षिण आफ्रिकेसमोर १७९ धावांचे लक्ष्य होते. पण, त्याचा पाठलाग करताना त्यांना २० षटकांत ९ गडी बाद १६१ धावाच करता आल्या. ऑस्ट्रेलियाने १७ धावांनी सामना जिंकला आणि यासह ३ टी २० सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.



**शांघाय मास्टर्स स्पर्धेत खेळणार** | **रॉजर अँड फ्रेंड्स सेलिब्रिटी डबल्समध्ये सहभाग**

# टेनिसचा बादशाह रॉजर फेडरर पुन्हा मैदानावर परतणार

| शांघाय | वृत्तसंस्था |

टेनिसची मोठी स्पर्धा विम्बल्डनची सर्वाधिक ८ जेतेपदं जिंकणारा सर्वात यशस्वी खेळाडू रॉजर फेडरर निवृत्तीनंतर पुन्हा मैदानावर उतरणार आहे. रॉजर फेडररने ३ वर्षांपूर्वी निवृत्ती जाहीर केली होती. दिग्गज खेळाडू रॉजर फेडरर २०२५ च्या शांघाय मास्टर्स स्पर्धेत खेळणार असल्याचे निश्चित झाले आहे. निवृत्तीनंतर तो पहिल्यांदाच एखाद्या मोठ्या स्पर्धेत खेळताना दिसणार आहे. १० ऑक्टोबर रोजी किझोंग स्टेडियमवर होणाऱ्या रॉजर अँड फ्रेंड्स सेलिब्रिटी डबल्स स्पर्धेत तो सहभागी होणार असल्याचे फेडररने सांगितले.

२०१७ नंतर फेडरर पहिल्यांदाच शांघायमध्ये खेळणार आहे. २०१७ मध्ये रॉजरने याठिकाणी त्याचे दुसरे टेनिसमधील एकेरी जेतेपद पटकावले होते. ही डबल्स स्पर्धा खूप खास असणार आहे. फेडररसह अनेक सेलिब्रिटी यात सहभागी होतील. यामध्ये प्रसिद्ध अभिनेता वू लेई, मार्शल आर्टिस्ट आणि अभिनेता डोनी येन आणि माजी डबल्स जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेला झेंग जी यांचा समावेश आहे. एका प्रमोशनल व्हीडिओ मध्ये रॉजर फेडरर म्हणाला, नमस्कार, मी रॉजर आणि शांघाय मास्टर्ससाठी किझोंग स्टेडियममध्ये परतल्याने मला खूप आनंद होत आहे. शांघाय नेहमीच माझ्यासाठी एक खास ठिकाण राहिलं आहे. येथील चाहते कमाल आहेत आणि आठवणी अविस्मरणीय आहेत. शांघाय मास्टर्स १ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर दरम्यान खेळवली जाणार आहे. गतवर्षीचे या स्पर्धेचा विजेता जानिक सिनर आहे, ज्याने अंतिम सामन्यात नोवाक जोकोविचचा ७-६ (४), ६-३ असा पराभव केला. २०२२ मध्ये लेव्हर कप दरम्यान फेडररने व्यावसायिक टेनिसमधून निवृत्ती घेतली. त्याचा प्रतिस्पर्धी आणि मित्र राफेल नदालसह खेळताना त्याने त्याचा अखेरचा डबल्स सामना जॅक सॉक आणि फ्रान्सिस टियाफो विरुद्ध खेळला, ज्यामध्ये त्यांना ४-६, ७-६ (२), ९-११ असा पराभव पत्करावा लागला. २४ वर्षांच्या शानदार कारकिर्दीत, फेडररने २० ग्रँड स्लॅम एकेरी जेतेपदं जिंकली, ज्यात विक्रमी आठ विम्बल्डन जेतेपदांचा समावेश आहे.

तो ३१० आठवडे जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर होता, त्यापैकी २३७ सलग त्याने पहिले स्थान कायम ठेवले होते. २००८ च्या ऑलिम्पिकमध्ये फेडररने स्टॅन वॉवरिंकासह पुरूष दुहेरीत सुवर्णपदक आणि २०१२च्या ऑलिम्पिकमध्ये एकेरीत रौप्यपदक जिंकले. या वर्षाच्या सुरुवातीला राफेल नदालच्या गौरवशाली कारकिर्दीचा सन्मान करण्यासाठी आयोजित समारंभात फेडररने नोवाक जोकोविच आणि अँडी मुरे यांच्यासोबतही सहभाग घेतला होता.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)